# संपादकीय

## ग्रंथालये, नव्हे अद्ययावत माहिती तंत्रज्ञान केंद्रे!

आपल्याकडे शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये, विद्यापीठांमध्ये ग्रंथालये असतात; तशीच गाव, तालुका, जिल्हा, शहर पातळीवरची ग्रंथालयेही असतात. राज्य सरकारची शासकीय ग्रंथालये असतात. तर कलकत्ता येथील नॅशनल लायब्ररीमध्ये भारतातील प्रत्येक नवे पुस्तक उपलब्ध असावे असे अपेक्षित आहे.

ग्रंथालये ही केवळ वाचकांना पुस्तके वाचायला देण्याची केंद्रे असे मानले जात असे. ज्ञान, माहिती, रंजन यासाठी पुस्तकांचे वाचन हा एक सोयीस्कर मार्ग मानला जात असे.

आता ग्रंथालये ही केवळ पुस्तकांच्या देवघेवीची ठिकाणे ही कल्पना मागे पडली आहे. हे माहिती-तंत्रज्ञानाचे युग आहे; इंटरनेटचे युग आहे आणि माहिती केंद्रे– इन्फॉर्मेशन सेंटर्स म्हणून ग्रंथालयांकडे आता पाहिले जात आहे. ग्रंथपाल हा केवळ आता वाचकांना पुस्तके देणारा कर्मचारी राहिलेला नाही; माहिती तंत्रज्ञ (इन्फर्मेशन ऑफिसर) म्हणून आता त्याची नवी भूमिका राहणार आहे. वाचकाला कुठल्याही विषयाची माहिती हवी असेल तर नेमके संदर्भ देण्याची त्याची क्षमता आता रोजच्या रोज कसाला लागणार आहे. त्यासाठी आपल्या स्वत:च्या ग्रंथालयाबरोबर राज्यातील, देशातील व जगातील इतर ग्रथालयेही त्याला उपयुक्त ठरू शकतील आणि इंटरनेवरूनही हवे ते संदर्भ त्याला शोधून काढता येतील. वाचकाचा वेळ व वाचकाच्या गरजा यांची नेमकी सांगड घालण्याचा साक्षेप त्याला यापुढे दाखववावा लागेल. ग्रंथालयांची उपयुक्तता आता अधिक व्यापक होत जाणार आहे आणि केवळ पुस्तकांची संख्या वा वृत्तपत्र- नियतकालिकांची संख्या यावर त्याचे मोल यापुढे ठरणार नाही. इंटरनेटसारख्या सुविधा व विविध विषयांचे संदर्भ झटपट देण्याची तेथील माहिती-अधिकाऱ्यांची चपळता यावर त्याचे मोल ठरणार आहे. हे लक्षात घेऊन यापुढे ग्रंथपालांच्या प्रशिक्षणातही बदल घडणे अपरिहार्य आहे. माहिती अधिकारी म्हणून त्याची प्रतिष्ठा व जबाबदारी यातही भर पडणार आहे.

ग्रंथ हे यापुढे केवळ मुद्रित शब्दांच्या व पुस्तकांच्या रूपात असणार नाहीत. ते 'सीडी रॉम'च्या रूपात किंवा इंटरनेटवरील वेबसाइटच्या रूपातही असू शकतील. ई-बुक्सच्या रूपात ते संगणकाच्या फलकावर वाचता येऊ शकतील. संगणक स्वस्त होत जातील, इंटरनेटचे दर कमी होत जातील, आणि संगणक-इंटरनेटचा शिरकाव घराघरात होईल. टेलिव्हिजनवरूनही इंटरनेट ॲक्सेस होऊ लागेल. टेलिव्हिजन संच, टेलिफोन आणि संगणक-इंटरनेट हे कुठल्याही घराचे अपरिहार्य घटक ठरतील; आणि त्याद्वारे संपूर्ण जगाशी संपर्क राहू शकेल. सर्व व्यवहारही त्याद्वारे होऊ लागतील. आपल्या सर्वांच्या जीवनशैलीतच



त्यामुळे आमूलाग्र बदल घडणार आहे. इंटरनेटचे मायाजाल रोज नवनव्या संकल्पना माणसापुढे सुलभपणे ठेवत आहे आणि माणसाच्या आशा-अपेक्षांचाही आलेख वरवर चढत आहे. माहितीतंत्रज्ञानाच्या क्रांतीप्रमाणेच अपेक्षांमध्येही क्रांती घडून येत आहे, आणि या वाढत्या अपेक्षांच्या पूर्ततेचे एक साधन म्हणून ग्रंथालयांनी स्वत:ला 'माहिती केंद्रा'मध्ये परिवर्तित करण्याची तातडीची गरज आहे. नव्या ज्ञानाचा पाठपुरावा करीत त्यांना अद्ययावत राहावे लागणार आहे. इंटरनेटवर हवी ती माहिती काही क्षणात मिळू शकते; तशीच माहिती केंद्रांना ती देता यायला हवी असे वाचकांना आता अपेक्षित राहणार. तशी माहिती देऊ शकणारी ग्रंथालयेच टिकून राहतील, तशी माहिती देऊ न शकणारी ग्रंथालये वाचकांच्या अभावी ओस पडतील. वाळवीच्या भक्ष्यस्थानी पडतील.

इंटरनेटवर आपल्याला हवी ती माहिती शोधणे हेही एका परीने सोपे नाही; परंतु ते तितकेसे अवघडही नाही. शेवटी इंटरनेटवर विविध व्यक्तींनी ज्ञानाचे जे वर्गीकरण करून माहिती संग्रहाचे भांडार खुले केले आहे; ते या क्षणाला जरी पूर्ण असले तरी पुढच्या क्षणी अपुरे वाटावे इतके नवे ज्ञान क्षणाक्षणाला मानवी आकलनकक्षेत येत आहे.

इंटरनेटवरील वर्ल्डवाइडवेब (www) द्वारे केवळ संहिताच नव्हे तर रंगीबेरंगी आकृती आणि चित्रपटसदृश हालचाली आवाजासह आपल्यापुढे येतात. वेबचे प्राथमिक एकक म्हणून 'पेज'चा उल्लेख होत असला तर पेज म्हणजे केवळ एक पृष्ठ नव्हे. या पेजचा विस्तार छापील पुस्तकातील पानापेक्षा मोठा असू शकतो. स्वत:चे होम पेजही त्यावर तयार करून आपली माहिती देता येते. विशिष्ट विषयावरील माहिती मिळवून, ती हवी तर प्रिंटरद्वारे मुद्रित स्वरूपातही मिळवता येते.

उदाहरणादाखल, दि ओपन युनिव्हर्सिटीच्या एमए पेजेसद्वारे पुढील प्रकारे माहिती उपलब्ध होऊ शकते.

http://www. open ac. uk/student web/artsma/

या साइटवर गेले की पुढील पर्याय समोर येतात.

१. लायब्ररीज– ब्रिटिश लायब्ररी, लायब्ररी ऑफ काँग्रेस, इतर विद्यापीठांची ग्रंथालये यात उपलब्ध असणाऱ्या पुस्तकांची सूची नेटवर मिळू शकते. त्यातून आपल्याला हव्या असणाऱ्या विषयावरील पुस्तकांचा शोध घेता येतो.

२. इतर ग्रंथसंदर्भ आणि संशोधन सामग्री (बिब्लिओग्राफिकल अँड स्कॉलरली रिसोर्सेस).

३. संदर्भ साहित्य (रेफरन्स वर्क्स)

४. इलेक्ट्रॉनिक टेक्स्ट्स अँड टेक्सटूल्स

५. न्यूजपेपर्स. जर्नल्स अँड आर्टिकल्स

६. म्युझियम्स अँड व्हिज्युअल रिसोर्सेस

७. पब्लिशर्स, बुकशॉप्स

८. स्टडी टूल्स, इन्फर्मेशन

९. लिटरेचर लाइन रिसर्च रिसोर्सेस

(अ) जनरल लिटरेचर रिसोर्सेस

(ब) दि एटीन्थ सेंच्युरी नॉव्हेल

(क) पोएट्री अँड क्रिटिझिझम १८३०-१८९०

(ड) दि नॉव्हेल इन इंग्लिश १८८०-१९३० इ.


या प्रत्येक बाबीवर टिक करून हवी ती माहिती मिळवण्याचे तंत्र आत्मसात केले की पुढे संदर्भाबाबत अडचण येत नाही.

सर्व लक्षात घेऊन ग्रंथालयांनी व ग्रंथपालांनी आपली प्रतिमा नव्या माहितीयुगाला साजेशी अशी जनमानसात रुजवायला हवी. ग्रंथालये म्हणजे माहिती तंत्रज्ञानाची केंद्रे आणि ग्रंथपाल म्हणजे माहितीतंत्रज्ञ. ही नवी प्रतिमा ग्रंथालयांच्या स्वरूपातही कालोचित असे परिवर्तन घडवून आणणारी ठरेल. ग्रंथालयांची उपयुक्तताही त्यामुळे वाढेल. ग्रंथालयामधील जुन्या बंदिस्त कपाटांवरची धूळ झटकली जाईल. जुन्या ग्रंथांचे संदर्भ मूल्य नव्याने जाणवेल. त्यांना नवे वाचक अभ्यासक भेटतील. वाचकांच्या बदलत्या अभिरुचीचे व गरजांचे भान ठेवून या नव्या माहिती तंत्रज्ञान केंद्रांनाही नवे रूप धारण करावे लागेल.

केवळ सरकारी अनुदानावर अवलंबून राहून तुटपुंज्या रकमेत ओढगस्तीने ग्रंथालये चालवण्याची मानसिकता बदलून, नवी माहिती केंद्रे ही एकविसाव्या शतकातील सायबर कॅफे, छंद-केंद्रे, करमणूक केंद्रे म्हणून विकसित करावी लागतील. येथे या, संगणकावर गेम्स खेळा, सायबर कॅफेत हव्या त्या माहितीचे ब्राउझिंग करा, चॅट सेशन्स भरवा, क्विझ काँपिटिशन्स घ्या, मुलांसाठी नाटुकली करा, कविता वाचनाच्या स्पर्धा घ्या. एखाद्या क्लबसारखे वातावरण तयार करा. या हॉबी सेंटरवर गेले नाही, सायबर कॅफेत गेले नाही, तर चुकल्याचुकल्यासारखे वाटेल असे तेथे आकर्षण निर्माण करा.

ग्रंथालयांनी आपली कात टाकून, एकविसाव्या शतकाचे आव्हान स्वीकारायला हवे.

**-संपादक**






आमच्या दीपोत्सव योजनेत सहभागी व्हा आणि दर्जेदार पुस्तके भरपूर सवलतीत मिळवा.

*आपल्या मित्रांना ही 'अक्षर मिठाई' भेट द्या.*


**अधिक माहिती पान नं. ४४ वर!**



# साहित्यवार्ता

## सर्वसामान्यांच्या मदतीनेच लोकशाही बळकट करणे शक्य

''लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट करायची असेल, तर खेड्यापाड्यांत राहणाऱ्या सर्वसामान्य माणसाला हाताशी धरूनच काम करावे लागेल,'' असे मत पाणलोट क्षेत्र विकासासाठी काम करणाऱ्या 'अफार्म' या संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. मुकुंद घारे यांनी व्यक्त केले.

ग्रामीण विकासासाठी विविध पातळ्यांवरून काम करणाऱ्या 'चैतन्य', 'वॉटर' आणि 'बाएफ' या संस्थांतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या आणि स्वयंसाह्य गट चळवळीबाबत मार्गदर्शन करणाऱ्या साहित्याचे प्रकाशन दि १३-१०-२००० रोजी झाले. 'वसा विकासाचा' (लेखक : रवींद्र देसाई, पुणे), बचतनामा (लेखक : प्रा. विजय कुलकर्णी, औरादशाहजानी, लातूर), थेंबे थेंबे तळे साचे (चित्रमय मार्गदर्शिका) आणि 'आमचे व्यासपीठ स्वयंसहायता गट' (लेखिका : डॉ. अश्विनी घोरपडे) या साहित्यांचे प्रकाशन डॉ. घारे यांनी केले.

ते पुढे म्हणाले, ''आजची लोकशाही ही फक्त लोकप्रतिनिधीपुरतीच मर्यादित राहिल्याने सर्वसामान्यांच्या आशाआकांक्षांना कमी वाव मिळतो. लोकशाहीची खरी ताकद ग्रामीण भागातील तळागाळातला कष्टकरी माणूस हीच आहे. ही ताकद हाताशी धरून आपल्याला लोकशाही बळकट करावी लागेल. त्यासाठी मूठभर लोकांच्या हातात सत्ता सोपवून चालणार नाही, तर सामान्य जनतेलाही त्यात सहभागी करून घ्यावे लागेल.''

## ग्रंथालय सेवकांची मागणी

महाराष्ट्र शासनाकडून गेल्या बत्तीस वर्षांपासून राज्यातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी निश्चित होत नसल्यामुळे, राज्यातील सुमारे सहा हजार ग्रंथालयांमधील ग्रंथपाल आणि ग्रंथालय सेवकांचे भवितव्य धोक्यात येण्याची चिन्हे आहेत.

अपुऱ्या मानधनावर पूर्ण वेळ काम करणे या कर्मचाऱ्यांना अन्यायकारक ठरत असून, शासकीय पातळीवरून याबाबत फारशा हालचाली होताना दिसत नाहीत, अशी खंत जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय बाबर यांनी प्रकट केली.

ग्रंथालयासंदर्भात स्वतंत्र कायदा ता. एक मे १९६८ पासून 'महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम १९६७' नावाने प्रत्यक्षात अमलात आला. त्या वेळी ग्रंथालयांची राज्यातील एकूण संख्या ४७४ होती. राज्यातील सुमारे वीस हजार ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी ठरविण्यासाठी

१९६७ चा कायदा बदलणे आवश्यक आहे. कायद्यात बदल करून वेतनश्रेणी ठरवण्यात आली, तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा बोजा शासकीय तिजोरीवर निश्चितच पडणार आहे.

राज्यातील पाच हजार ग्रंथालयांसाठी शासन दहा कोटी रुपये सध्या उपलब्ध करून देत आहे. वेतनश्रेणी लागू झाल्यास ग्रंथालयांची संख्या सुमारे पंचवीस हजारापर्यंत गेल्यास शासकीय तिजोरीवर आणखी शंभर कोटी रुपयांचा भार पडेल. याबाबत पाच फेब्रुवारी २००० रोजी मालेगाव (जि नाशिक) येथे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या ४४ व्या अधिवेशनात जयानंद मठकर यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. एकीकडे शासनाकडून 'गाव तेथे ग्रंथालय' या संकल्पनेचा प्रभावी प्रचार करण्यात येतो. दुसरीकडे मात्र ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी ठरवून त्यांची जबाबदारी स्वीकारण्यास शासन उदासीन आहे. राज्य, विभागीय आणि जिल्हा पातळीवर संघटित होऊन पूर्ण वेळ ग्रंथालयाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी शासनाने त्वरित ठरवावी. काही अंशी याचा भार स्थानिक स्वराज्य संस्थानीही स्वीकारावा, अशी मागणी राज्यातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांची आहे.

## 'सव्यसाची': दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन

'सव्यसाची' कादंबरीत भारताच्या सद्य:स्थितीबाबत यथार्थ दर्शन घडविण्यात आले आहे, असे मत पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी संजय सोनवणी यांच्या 'सव्यसाची' या कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन व्यक्त केले.

''समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सद्य:स्थितीचे यथार्थ दर्शन घडविण्यात लेखक सोनवणी यशस्वी झाले आहेत. या कादंबरीत नाट्यात्मकता व गतिमानता अचूक साधली गेल्याने त्यात वाचनीयता आली आहे.''

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह प्रा. अविनाश सप्रे म्हणाले, ''वास्तवावर आधारित कल्पनेचा अनुभव 'सव्यसाची' कादंबरीच्या वाचनाने मिळत असल्याने तिने अल्पावधीत लोकप्रियता संपादन करण्यात यश मिळविले.''

'माफिया' टोळ्यांमुळे निर्माण झालेल्या वर्तमानकालीन सामाजिक जीवनाचे चित्र 'सव्यसाची' कादंबरीत मांडण्यात आले आहे असे सातारा येथील कर सल्लागार अरुण गोडबोले यांनी सांगितले. लेखक संजय सोनवणी यांनी प्रास्ताविकात पुस्तकाबाबत मनोगत व्यक्त केले. अभय शास्त्री यांनी आभार मानले.

## सध्याची नाट्यसमीक्षा प्राध्यापकी स्वरूपाची

''मराठीत सध्या होणारी नाटकाची समीक्षा प्राध्यापकी स्वरूपाची असते. संहितेच्याच अंगाने ती केली जाते. अभिनयाची समीक्षा मराठीत खऱ्या अर्थाने झालेली नाही,'' असे मत ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केले.

दि. २९ सप्टेंबर रोजी प्रा. एम. पी. पाटील यांनी लिहिलेल्या 'नाट्यसमीक्षा-संहिता व रंगप्रयोग या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. लागू यांच्या हस्ते झाले. श्री. पाटील यांच्याच 'ज्ञानेश्वरी-इहवादी दृष्टिकोन' या पुस्तकाचे साहित्य व संस्कृती महामंडळाचे उपाध्यक्ष प्रा. रतनलाल सोनग्रा यांच्या हस्ते प्रकाशन झाले. सिग्नेट पब्लिकेशन्सतर्फे ही पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत.

वर्तमानपत्रात येणारी नाट्यसमीक्षा हे 'रिपोर्टिंग' असते, असे नमूद करून डॉ. लागू म्हणाले, ''मराठी नाटकांइतकीच मराठी समीक्षाही थिटी आहे. नाटक थिटे असल्याने समीक्षा थिटी असल्याचे काही समीक्षक सांगतात. समीक्षा हेदेखील शास्त्र आहे. आतापर्यंत झालेल्या समीक्षेचा लेखक, कलाकार, प्रेक्षक यांच्यावर झालेल्या परिणामाचा शोध घ्यायला हवा. अभिनयाकडे समीक्षकांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे उच्च दर्जाचा अभिनय प्रेक्षकांच्या मनावर ठसला नाही.

प्रा. सोनग्रा म्हणाले, ''भारतीय तत्त्वज्ञानातील वैचारिक विसंगती श्री. पाटील यांनी विवेकाने मांडली आहे. सांस्कृतिक व वैचारिक दहशतवादाची या देशात परंपरा आहे. या दहशतवादातूनच चातुर्वर्ण्याचे समर्थन केले जाते. पुराणकथा, तत्त्वज्ञान यातून स्वर्गाच्या कल्पना मांडल्या जातात. प्रत्यक्षात या कल्पना विशिष्ट वर्गाच्या हितसंबंधासाठी जोपासल्या जातात. कनिष्ठ वर्णांनी मृत्यूनंतरच्या चांगल्या जीवनासाठी सारा जन्म गुलामगिरीत घालवावा, अशी अपेक्षा भारतीय तत्त्वज्ञानात व्यक्त केली आहे. गीतेने हिंसाचारही योग्य ठरविला आहे. या सर्व विसंगती समोर आणण्याचे धाडस पाटील यांनी केले आहे.''

## विज्ञान व अध्यात्माच्या समन्वयाने मानव जातीचे कल्याण

''अध्यात्माची ताकद विज्ञान नकारू शकत नाही, त्यांचा समन्वय मानव जातीचे कल्याण करू शकतो,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी केले.

१४ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेचे अध्यक्ष प्रा. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते अरुणविजय महाराज यांच्या 'ध्यानसाधना' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. योग-विज्ञान चिकित्सा संस्थेचे संचालक डॉ. र. ना. शुक्ल यांच्या 'विश्वचैतन्याचे गूढ' या पुस्तकाच्या इंग्रजी अनुवादाचे प्रकाशन डॉ. भटकर यांच्या हस्ते झाले.

अध्यात्म आणि विज्ञान यांचा परस्पर संबंध स्पष्ट करताना डॉ. भटकर म्हणाले, ''विज्ञान आणि अध्यात्म वेगळे नाही. विज्ञानाचे आकलन होण्यासाठी ध्यानधारणा आवश्यक आहे. विज्ञान म्हणजे विशिष्ट ज्ञान, त्याचा वापर विपरीत कारणासाठी होऊ नये म्हणून अध्यात्माची गरज भासते. अनादि काळापासून शास्त्रज्ञ अध्यात्माशी निगडित आहेत, त्याचे दाखले वेदांमध्येही मिळतात.''

''विकार जडू नयेत म्हणून संत-मुनींनी प्राचीन काळापासून एक जीवन पद्धती सांगितली आहे. विज्ञानानेही ती मान्य केली आहे. आधुनिक काळातील समाज अध्यात्माकडे आकर्षित होत आहे, हे एक सुचिन्ह आहे,'' असे मत प्रा. कराड यांनी या वेळी व्यक्त केले.

''योगविज्ञान संस्थेतर्फे निसर्गोपचार आहार आदी चिकित्सा पद्धतींवर आधारित नुकतेच एक शिबिर घेण्यात आले. त्यात विविध निबंध सादर झाले. त्यातील माहिती

(http :/ heritage. eth net 1) वेबसाईटवर योगविज्ञान चिकित्सा विभागात उपलब्ध करून देण्यात आली आहे,''

या वेबसाईटचे उद्घाटन डॉ. भटकर यांच्या हस्ते झाले. वैकल्पिक चिकित्सा असोसिएशनच्या समन्वयक सुजाता वैद्य यांनी सूत्रसंचालन केले.

## 'पहिला बहर'चे प्रकाशन

''लहान मुलांच्या कानावर आर्या, श्लोक, लोकगीते पडू द्या. चित्रपटाची गाणीही त्यांना गाऊ द्या. त्यातील शब्दांच्या नाद-लयीच्या छंदातूनच मुलांची सर्जनशीलता फुलत जाईल,'' असे ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांनी म्हटले.

सिग्नेट पब्लिकेशन्सतर्फे सायली विवेक खरे हिचा 'पहिला बहर' हा कवितासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. अभिनव विद्यालयाच्या संचालिका मीना चंदावरकर प्रमुख पाहुण्या होत्या. लहान मुलांना जे नाद-लयीचे आकर्षण असते, ते पंधराव्या वर्षी कविता लिहिणाऱ्या सायलीलाही आहे, असे सांगून श्रीमती शेळके म्हणाल्या, ''तिच्याकडे कुतूहल, श्रद्धा, जिज्ञासा आहे. या कवितेत मनाचे अनेक रंग उमटलेत. विकसनशीलतेची शक्यता असलेली कवयित्री आहे. लहान मुलांची कल्पनाशक्ती स्वाभाविक जिज्ञासेतून आलेली असते, मोठ्यांनी त्यात लुडबूड करून ती बिघडवता नये.''

श्रीमती चंदावरकर म्हणाल्या, ''सायलीची कलासक्त वृत्ती मी अनुभवली आहे. असीम मानवता प्रेम व देवावरची श्रद्धा तिच्या कवितेतून व्यक्त होते.''

## प्रसारमाध्यमांची आजची गती

''प्रसारमाध्यमांची आजची गती आणि स्पर्धेचा वितार करतानाच वर्तमानाचे सर्व संदर्भ डोळसपणे पाहणे आवश्यक असते. काळ कितीही बदलला तरी संवेदनशीलता, व्यापकपणा आणि समाजशील वृत्ती हाच माध्यमांचा पाया राहील,'' असे मत 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांनी पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागातील विद्यार्थ्यांसमोर बोलताना व्यक्त केले, ''वृत्तपत्रात काम करण्यासाठी बहुपदरी जाणिवा विकसित कराव्या लागतील. हा प्रवास अविरत असतो; पत्रकाराने आपली संवेदनशीलता हरवणे माणूस म्हणूनही योग्य नाही.''

''वृत्तपत्रात काय छापून आले आहे, यावर मते बनविली जातात. त्यामुळे वस्तुनिष्ठ चित्रण देण्याची जबाबदारी माध्यमांवर असते. लोकांपर्यंत माहिती पोचविण्याचे महत्त्वाचे काम पत्रकाराला करावे लागत असल्याने जगाकडे पाहण्याची त्याची दृष्टी व्यापक हवी, त्याचे आकलन व्यापक हवे. चांगला पत्रकार होण्यासाठी लोकांमध्ये मिसळणे आणि वाचन-मनन करणे या आवश्यक गोष्टी ठरतात.''

माहिती तंत्रज्ञानाची गती, ज्ञानाचा स्फोट आणि जगच एक खेडे यावर शहरांमध्ये होणारी चर्चा व ग्रामीण वास्तव वेळीच लक्षात घ्यावे, ''माध्यमांचा पुढचा प्रवास आव्हानांचाच आहे. अणुबॉंब बनविणाऱ्या देशात निम्मे लोक निरक्षर आहेत. माध्यमांचे चेहरे व हेतू बदलत आहे. अशावेळी माध्यमांत येणाऱ्या जाणिवांना महत्त्व राहील. आपल्याला या क्षेत्रात नेमके काय करावयाचे आहे, यासंबंधीची दिशाही महत्त्वाची असते.''



''पत्रकाराला भाषा कमवावी लागते. त्यासाठी सतत शिकावे लागते. राजकारणाशिवाय अन्य विषयांना मोठे मोल असून त्यांच्याविषयी माहिती देणे गरजेचे आहे. लोकांचे प्रश्न मांडण्याची बाजू पत्रकाराने सांभाळावी.'' विभागप्रमुख प्रा. अरुण साधू यांनी प्रास्ताविक केले.

## आंतरिक शांतता मिळविण्यास मनाचा शोध घेणे आवश्यक

''विज्ञानामुळे विश्व जवळ आले असले, तरी माणसे मात्र दुरावत आहेत. बाह्य प्रगतीच्या ध्यासात मनुष्याने आपली आंतरिक शांतता गमाविली आहे. ही शांतता मिळविण्यासाठी अंतर्मुख होऊन मनाचा शोध घेणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन फुलगाव येथील श्रुतिसागर आश्रमाचे स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांनी पुणे येथे केले.

भारतीय विद्या भवन, पुणे आणि ॲड. डी. आर. फाउंडेशनच्या वतीने डॉ. प्र. न. जोशी यांना स्वामी स्वरूपानंद सरस्वती यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, तीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

''विज्ञानामुळे मनुष्याचे जीवन आमूलाग्र बदलले आहे. नजीकच्या काळात काय होईल, याची कल्पनाही करणे अशक्य बनले आहे. सर्व सोयी, सुविधा उपलब्ध होत असताना मनुष्याच्या मनाची अस्वस्थता मात्र भयंकर वाढली आहे. विज्ञानामुळे खूप प्रगती झालेली असली, तरीही आनंदाचा शोध लावण्यात मात्र यश आलेले नाही. कारण आनंद, शांतता या विश्वामध्ये अस्तित्वात असलेल्या गोष्टी नाहीत, तर तो अनुभव घेण्याचा विषय आहे.''

हा अनुभव घेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने स्वतः मध्येच अधिकाधिक डोकावून बघितले पाहिजे. मानवी जीवनाचा शोध घेण्यासाठी मनाचा अधिकाधिक शोध घेणे आवश्यक आहे. हा शोध घेताना मध्ये येणारा अहंकार दूर सारणे आवश्यक आहे. अहंकाराचा नाश होत नाही, तोपर्यंत शांतता सापडणार नाही. निमित्तमात्र प्रसंगामुळेच मनाला नैराश्य, क्षोभ या गोष्टींचा सामना करावा लागतो. त्यामुळेच अहंकार दूर करण्याचा प्रयत्न आवश्यक आहे.''

सत्काराला उत्तर देताना डॉ. जोशी म्हणाले, ''तीस वर्षे स्नेह असलेल्या संस्थेकडून होणारा सत्कार आनंद देणारा आहे. स्नेह प्रकट करण्याची आपली परंपरा आहे, त्यामुळेच मी या स्नेहाचा स्वीकार कृतज्ञतेने करीत आहे.'' नगरकर फाउंडेशनचे विश्वस्त अरविंद नगरकर यांनी मानपत्राचे वाचन केले. डॉ. स्वाती पुणेकर यांनी आभार मानले.

## 'बालवाडी'च्या दिवाळी अंकाचे चिमुकल्याच्या हस्ते प्रकाशन

हसतखेळत, आरडाओरडा करत, टाळ्यांच्या कडकडाटात एका चिमुकल्याच्या हस्ते 'बालवाडी' या दिवाळी अंकाचे प्रकाशन पुणे येथे झाले.

बालवाचकांचा अंक त्यांच्याच खेळाच्या मैदानात जाऊन त्यांच्या हस्ते प्रकाशित करण्याचा अभिनव उपक्रम अपूर्व प्रकाशनाने राबविला. या उपक्रमाचे कौतुक करण्यासाठी बालसाहित्यकार दत्ता टोळ उपस्थित होते.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक वर्गातील मुलांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी व्हावे म्हणून वंचित विकास संस्थेतर्फे अभिरुची वर्ग घेतले जातात. त्या वर्गातील ऋग्वेद या पहिल्या इयत्तेतील

विद्यार्थ्यांच्या हस्ते 'बालवाडी'चे प्रकाशन झाले.

या दिवाळी अंकाच्या संपादक कवयित्री हेमा लेले यांनी अंकाबद्दलची माहिती दिली त्याचप्रमाणे मुंबईत मुलांच्या समस्येसंदर्भात त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या 'चाईल्ड लाईन'बद्दलही माहिती दिली. सहसंपादक मंगेश कपटकर, व्यवस्थापकीय संपादक पद्माकर ठोंबरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## पहिले ते चौथीसाठी नवनीतची पूरक पुस्तिका

मराठी माध्यम शाळांच्या पहिली ते चौथी वर्गासाठी सरकारने 'माय इंग्लिश बुक वन' हे पाठ्यपुस्तक नेमले आहे. या पाठ्यपुस्तकावर आधारित नवनीत पब्लिकेशन्सने 'विकास लेट अस लर्न इंग्लिश-बुक वन' ही पूरक पुस्तिका प्रकाशित केली आहे. ही पुस्तिका सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध आहे.

प्राथमिक स्तरावरील इंग्रजी अध्ययनात विद्यार्थ्यांकडून केवळ इंग्रजी बोलण्याचा सराव अपेक्षित आहे. त्या दृष्टीने या पुस्तिकेची रचना करण्यात आली आहे. आवश्यक तेथे इंग्रजी शब्दांचे देवनागरी लिपीतून शास्त्रशुद्ध उच्चार देण्यात आले आहेत.

## 'हॉलमार्क कार्ड्स'तर्फे मराठी शुभेच्छापत्रे

हॉलमार्क कार्ड्स या कंपनीने मराठी शुभेच्छापत्रे आणली आहेत. दिवाळीचे औचित्य साधून ४२ प्रकारची विविधरंगी शुभेच्छापत्रे तयार करण्यात आली आहेत. प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते त्यांचे प्रकाशन झाले.

आकाशकंदील, लक्ष्मी, गणपती, रांगोळी व विविध प्रतिमांचा वापर या शुभेच्छापत्रात आहे– या पत्रांची किंमत चार ते सोळा रुपयांपर्यंत आहे, अशी माहिती कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी टी. व्ही. त्यागराजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## महाराष्ट्र तोडण्याचे कारस्थान मराठी जनतेने हाणून पाडावे.

अखंड महाराष्ट्रवादी जनता परिषदेत ठराव

''वैदर्भीय जनतेची इच्छा नसतानाही वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी काही मूठभर लोक स्वतःच्या स्वार्थासाठी पुढे आणत आहेत. महाराष्ट्र तोडण्याचे हे कुटील कारस्थान सर्व मराठी जनतेने हाणून पाडावे आणि त्यासाठीची चळवळ सुरू करावी,'' असे आवाहन पुणे येथे १४-१०-२००० रोजी भरलेल्या अखंड महाराष्ट्रवादी जनता परिषदेत करण्यात आले.

विधान परिषदेचे माजी सभापती जयंतराव टिळक, ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान, ज्येष्ठ कार्यकर्त्या अहल्याबाई रांगणेकर, ज्येष्ठ पत्रकार मुकुंदराव किर्लोस्कर, डॉ. श्रीकांत जिचकार, सुधाकर डोईफोडे, प्रा. अरुण साधू, डॉ. व्यंकटेश काब्दे, रामदास फुटाणे, यांनी या परिषदेत भाग घेतला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या आठवणींना या निमित्ताने उजाळा मिळाला.

दहा कोटी मराठी माणसांचे राज्य कशासाठी तोडायचे? असा सवाल या परिषदेत उपस्थित करण्यात आला. वेगळ्या विदर्भ राज्याचा प्रश्न केवळ विदर्भापुरता मर्यादित नाही. महाराष्ट्राच्या विभाजनाची बीजे त्यामध्ये आहेत. मुख्य म्हणजे मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याची भीती यामुळे निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्व मराठी जनतेने एकत्र येऊन लढा उभा केला पाहिजे, असे मत सर्व वक्त्यांनी व्यक्त केले.

''दीर्घकाळ चळवळ, लढा आणि बलिदान यांतून मराठी जनतेने मिळविलेला संयुक्त महाराष्ट्र यापुढेही अखंड राहिला पाहिजे. दहा कोटी मराठी जनतेने महाराष्ट्राचे अखंडत्व टिकवावे आणि विभाजनवादी प्रवृत्तींना थारा देऊ नये. वेळ पडल्यास पुन्हा एकदा प्रखर आंदोलन करावे; तसेच, बेळगाव, कारवार आणि मध्य प्रदेशात गेलेला बुऱ्हाणपूर, छिंदवाडा, बेतूल, मूलतापी आदी प्रदेशही महाराष्ट्रात सामील करण्यात यावा,' असा ठराव या परिषदेत मंजूर करण्यात आला.

श्री. जयंतराव टिळक म्हणाले, ''संपूर्ण महाराष्ट्राला भाषिक एकजिनसीपणा आहे. महाविदर्भाची कल्पना पूर्वी फेटाळली गेली ती यासाठीच. अशा प्रकारे स्वतंत्र राज्य मागणीवाले संयुक्त महाराष्ट्राचे शत्रू आहेत. ही फुटीर वृत्ती मोडून काढली पाहिजे.''

प्रा. प्रधान म्हणाले, ''विदर्भातील अमराठी धनिकांनी महाराष्ट्र तोडण्याचा कट रचला आहे. याच लोकांनी तेथील मराठी जनतेची पूर्वी कोंडी केली होती. विदर्भावरील हे संकट मराठी माणसावरील संकट आहे. राजकीय पक्षांनीही बोटचेपी आणि संधिसाधू भूमिका घेऊ नये. मराठी भाषेच्या या प्रश्नावर त्यांनी ठाम भूमिका घ्यावी.वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी करणारे महाराष्ट्रविरोधक आहेत'' असे नमूद करून श्रीमती रांगणेकर म्हणाल्या, ''ही मागणी मान्य झाली तर स्वतंत्र मुंबई राज्याची मागणी पुढे आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे अशा कोणत्याही प्रकारच्या मागण्या पूर्ण' होऊ दिल्याच जाणार नाहीत. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन चळवळीतील हुतात्म्यांच्या पत्नीही प्रसंगी आंदोलनात उतरतील.''

डोईफोडे म्हणाले, ''संयुक्त महाराष्ट्र ही आपली गरज आहे. विदर्भ वेगळा व्हायचा की नाही याचे उत्तर नागपूरकरांनी नव्हे, तर पुणेकरांनी द्यायचे आहे. विदर्भ राज्याच्या विरोधातील चळवळ पश्चिम महाराष्ट्रात व्हायला हवी. राजकीय नेत्यांनीही दुटप्पी भूमिका सोडून देण्याची गरज आहे.''

प्रा, साधू म्हणाले, ''काही नेते तात्कालिक स्वार्थासाठी विदर्भाचा नारा देत आहेत. विदर्भाच्या बाहेरून आलेले लोक त्यात पुढाकार घेत आहेत. मराठी जनता यापासून दूर आहे.''

श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांनी अखंड महाराष्ट्रवादी जनता परिषदेचा ठराव मांडला. श्री. डोईफोडे यांनी अनुमोदन दिले. आचार्य अत्रे स्मृती प्रतिष्ठानने ही परिषद आयोजित केली.

## इंटरनेटवरील ज्ञानेश्वरीचे काम अंतिम टप्प्यात

''विश्वात्मक ईश्वरी शक्तीचा साक्षात्कार घडविणारा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ दृकश्राव्य ध्वनिफितीच्या व 'सीडी'च्या माध्यमातून जगभरात पोचला. आता सीडॅक संस्थेच्या सहकार्याने हा ग्रंथराज इंटरनेटवर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया पूर्ण होत आली आहे. आळंदी येथे या प्रकल्पावर

काम सुरू असून, आतापर्यंत तीन वर्षांत पाच अध्यायांची चित्रे ॲनिमेशनसहित निर्मितीप्रक्रिया आता पूर्ण झाली आहे. हा प्रकल्प क्रमशः पूर्ण करण्याबरोबरच आता मराठीशिवाय हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेत ज्ञानेश्वरीची भाषांतरे करण्याचे कामही चालू आहे.

इंटरनेटवरील ज्ञानेश्वरीचे १८ अध्याय संगणकावर 'ऑपरेट' करण्याचे काम सीडॅकने पूर्ण करून दिले आहे, आता सहाव्या अध्यायापासून पुढच्या अध्यायांचे ॲनिमेशनचे काम सुरू आहे. हे काम अतिशय अवघड आहे. कारण श्लोकांचा अचूक अर्थ प्रथम समजावून घेऊन, त्याची चित्रे काढावी लागतात, नंतर संगणकाद्वारे त्यांची हालचाल दाखवावी लागते. ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी त्यासाठी मार्गदर्शन केले आहे.

ज्ञानेश्वरीची सीडी अमेरिकेतील १५ हजार श्रोत्यांपुढे दाखविण्याचा उपक्रम कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या पुतणीने नुकताच केला.

''ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायात 'प्राकृतिक विज्ञान' (अध्यात्म) व 'वैकृतिक विज्ञान' (अध्यात्म) यांचे विवेचन करण्यात आले आहे. गणेशाचे चित्र ही वेद व अथर्वशीर्षात वर्णन केलेली वाङ्मयीन मूर्ती ज्ञानेश्वरांनी मंगलाचरणाच्या २० ओव्यांतून साकार केली आहे. या ओव्यांचे चित्ररूप विवेचन तयार करणारी 'सीडी' डॉ. भटकर यांच्या सहकार्याने तयार करण्यात आली आहे. डॉ. भटकर स्वत: ज्ञानेश्वरीचा इंग्रजीत अनुवाद करीत आहेत. इंग्रजी प्रतिशब्द ठरविताना आम्ही बराच खल करतो. ज्ञानेश्वरीचे हिंदी भाषांतर निम्मेअधिक पूर्ण झाले आहे, तर मराठीचे हे वैभव निपाणीकरशास्त्री संस्कृतमध्ये रूपांतरित करीत आहेत,''

आळंदी येथील ज्ञानेश्वर समाधिमंदिरात उभारण्यात येत असलेले इंद्रायणी नदीतील नवे ताम्रपट ज्ञानेश्वरी मंदिर दीड वर्षांत पूर्ण होईल. तेथील भिंतीवर प्रत्येकी एकेक फूट लांबी-रुंदीच्या ताम्रपटावर (वजन ५४० ग्रॅम) ज्ञानेश्वरीच्या ओव्या कोरल्या आहेत. अशा ५०० ताम्रपत्रांत (लांबी ५०० फूट) सर्व १८ अध्यायांचे श्लोक कोरले आहेत, ज्ञानेश्वरीनंतर 'अमृतानुभव' ग्रंथाचे ॲमिनेशन व टंकमुद्रण करण्याचे काम सुरू होईल.

## 'हॅरी पॉटर'च्या लेखिकेचे समाजासाठी योगदान

पॉटरमुळे ब्रिटनमध्येच नव्हे, तर जगभरात लोकप्रिय झालेल्या लेखिका जे. के. रोलिंग यांनी आपल्या संपत्तीचा वापर समाजासाठी करण्याचे ठरविले आहे.

नॅशनल कौन्सिल फॉर वन पेरंट फॅमिलीज या संस्थेला त्यांनी सहा आकडी रक्कम देणगी म्हणून दिली आहे. 'सन' या नियतकालिकात या संदर्भात आलेल्या वृत्तात रोलिंग यांनी किती रक्कम दिली, याचा उल्लेख केलेला नाही. आठवड्याला १०१ डॉलर या रकमेवर सहा वर्षांपूर्वी कसे दिवस काढले, याची माहिती त्यांनी दिली आहे. ही मदत शासकीय होती. मानहानी अथवा आपण कवडीमोल आहोत याची जाणीवही त्या काळात झाली नाही. तसेच तशी वागणूकही कोणी दिली नाही, असे त्या म्हणाल्या. आई म्हणून एकटे जगावे लागेल अशी आपली अपेक्षा नव्हती, असे नमूद करून त्या म्हणाल्या, की पहिल्या आठवड्याकरता असलेली आर्थिक मदत घेण्यास जेव्हा जावे लागले, त्या वेळी वेगळेच विचार चमकले. रोलिंग यांचे लग्न वयाच्या २७ व्या वर्षी झाले. त्यानंतर त्यांना



जेसिका ही मुलगी झाली. नंतर अवघ्या तीन महिन्यांत पतीने त्यांना सोडून दिले. या घटनेने त्यांच्यावर आभाळच कोसळले. जेसिकाचा जन्म ही आयुष्यातील एक आनंदाची घटना होती, असे त्यांनी नमूद केले आहे.

पोर्तुगालहून एडिंबर्गला परतताना, शिक्षक म्हणून नोकरी मिळेल ही त्यांची अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. मित्रांनी केलेल्या मदतीमुळे त्या मुलीचे संगोपन करू शकल्या आणि नंतर त्यांनी अध्यापनाचे काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर काही दिवसांतच 'हॅरी पॉटर अँड दि फिलॉसॉफर्स स्टोन' हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकामुळे रोलिंग यांना दोन कोटी पौंड इतकी रक्कम मिळाली.

## 'छात्र प्रबोधन'च्या विशेषांकाचे प्रकाशन

शालेय परीक्षांबरोबर जीवनातील परीक्षेत यशस्वी होण्यासाठी आवश्यक ते गुण मुलांमध्ये विकसित करण्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्नांची गरज आहे, असे प्रतिपादन 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांनी ज्ञान प्रबोधिनीच्या 'छात्र प्रबोधन'च्या शंभराव्या अंकाच्या प्रकाशन प्रसंगी केले.

'छात्र प्रबोधन'च्या अंकातील निवडक लेखांवर आधारित दरवळ आणि मृद्गंध या दोन कथासंग्रहांचे प्रकाशन डॉ. हे. वि. इनामदार यांच्या हस्ते झाले. महेंद्र सेठिया आणि वर्षा कुलकर्णी यांनी दिवाळी अंकाची माहिती दिली.

ग्रामीण भागातील मुले आणि युवक यांच्यासाठी यापुढे वर्षात सहा खास अंक काढण्याची योजना असल्याचे सेठिया यांनी जाहीर केले. श्रीमती शैलजा देशमुख यांनी कथासंग्रहाबाबत माहिती दिली. ज्ञानप्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश बापट यांनी आभार मानले.

## ढवळे प्रकाशन संस्थेचे द्विशतकात पदार्पण

गिरगावातील केशव भिकाजी ढवळे संस्थेने दि. २९ ऑगस्टला १०१ व्या वर्षात पदार्पण केले. त्याप्रसंगी ढवळे प्रकाशनाच्या १०७९ व्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

'आपल्या ज्ञानप्रकाशाने समकालीन मतमतांतरांच्या अंध:काराचा निरास करणाऱ्या आद्य शंकराचार्यांनी, सर्वसामान्यांना आकळेल अशा भाषेत अद्वैत तत्त्वज्ञान सांगितले; अडीच हजार वर्षांपूर्वी संपूर्ण भारतवर्षभर पदभ्रमण करून हिंदू धर्माचे पुनरुत्थान केले. आजच्या पुनश्च धर्मग्लानीच्या काळात शंकराचार्यांचे अद्भुत, प्रेरणादायी चरित्र वाचनीय कादंबरीरूपाने तरुण पिढीपुढे आणून, सच्चिदानंद शेवडे यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. ती कादंबरी प्रकाशित करून आपल्या द्विशतकात दिमाखाने प्रवेश करणाऱ्या ढवळे प्रकाशनाला माझ्या हार्दिक शुभेच्छा' असे उद्गार पुणे विद्यापीठाचे निवृत्त इतिहास विभागप्रमुख डॉ. कृष्णाजी नागेश चिटणीस यांनी काढले.

ढवळेकन्या आद्यायनी चिटणीस यांनी स्वागतपर भाषणात सांगितले की, 'गतवर्षी याच दिवशी ढवळे प्रकाशनाच्या शताब्दी वर्षाचा प्रारंभ सच्चिदानंद सुरेश यांच्याच 'श्री चिंतामणी विजय कथासार' या ग्रंथाच्या प्रकाशनाने झाला आणि आज समारोपही त्यांच्याच 'पुनरुत्थान'

या कादंबरीच्या नव्या आवृत्तीद्वारे होत आहे.' श्री. आंजनेय धनंजय ढवळे यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाला मौज प्रकाशनाचे प्रभाकर भागवत, माधव भागवत, पॉप्युलर प्रकाशनाचे पां. ना. कुमठा, ज्योत्स्ना प्रकाशनाचे विकास परांजपे प्रभृती प्रकाशक, चित्रकार सतीश भावसार इ. मंडळी उपस्थित होती.

## नाशिक येथे कुसुमाग्रज काव्य उद्यान

मराठी काव्यसृष्टीत कुसुमाग्रजांनी घातलेली मोलाची भर चिरंतन व्हावी. या हेतूने 'कुसुमाग्रज काव्य उद्यान' या अभिनव प्रकल्पाची उभारणी नाशिक महापालिकेतर्फे पंचवटीच्या पंपिंग स्टेशनलगतच्या उद्यानात करण्यात येत असून या प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा सांस्कृतिक कार्यमंत्री रामकृष्ण मोरे यांच्या हस्ते झाला. या उद्यानात कुसुमाग्रजांच्या निवडक कवितांचे ग्रेनाइटवर कोरलेले काव्यस्तंभ उभारले जाणार आहेत. महानगरातल्या विविध शाळा व महाविद्यालयांनी तसेच सांस्कृतिक संस्थांनी आयोजित केलेल्या काव्यवाचन व काव्यगायन स्पर्धा या उद्यानात आयोजित कराव्यात. यासाठी एका छोट्या काव्यमंचाची व श्रोत्यांना बसण्यासाठी कायमस्वरूपी आसन व्यवस्था करण्यात येणार आहे. उद्यानाला जोडूनच असलेल्या गोदावरीच्या विस्तीर्ण पात्रात नौकाविहाराची सोय करून नाशिक शहर आणि पंचवटीचे तीर जोडले जावेत तसेच सुप्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने कुसुमाग्रजांच्या जीवनपटावर निर्मिलेला 'प्रवासी पक्षी' हा चित्रपट सप्ताहातून एकदा नियमितपणे या उद्यानात दाखवला जावा, अशी कल्पना आहे. हे उद्यान सर्वांच्याच आकर्षणाचे केंद्र ठरेल.

## 'सुवार्ता'चा साहित्य मेळावा

वसईतून प्रसिद्ध होणाऱ्या 'सुवार्ता' मासिकाने रविवार १ ऑक्टोबर रोजी गिरीज येथे पूर्ण दिवस साहित्य मेळावा आयोजित केला होता.

'कथालेखक' 'मी आणि माझ्या कथा', 'महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी आणि साहित्यिकांची जबाबदारी' या परिसंवादात हरि नरके, उत्तम कांबळे, फ्रान्सिस डिमेलो, प्रमिला डिसोजा, संदीप राऊत, प्रकाश आल्मेडा, व्हिसेंट फरगोज, अभय शिरेकर, दयानंद आंबोलकर यांनी भाग घेतला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर 'मी असा घडलो' या विषयावर भाषण केले.

यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक निरंजन उजगरे यांना 'फादर स्टीफन साहित्य पुरस्कार' डॉ. मुणगेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार अडीच हजार रुपयांचा आहे. सुवार्ता मासिकातर्फे दर्जेदार साहित्यनिर्मितीबद्दल दर दोन वर्षांनी हा पुरस्कार जाहीर करण्यात येतो.

## नाशिक येथे फुलेआंबेडकरी साहित्य संमेलन

फुले आंबेडकरांच्या विचारधारेतून निर्माण झालेले साहित्य हे विज्ञाननिष्ठ असल्याने



काळाच्या प्रवाहात दीर्घकाळ टिकेल असे प्रतिपादन साहित्यिक व विचारवंत राजा ढाले यांनी फुलेआंबेडकरी साहित्यिक मेळाव्याच्या समारोपप्रसंगी केले. अध्यक्षस्थानी प्रा. महेंद्र भवरे होते.

घटना पुनर्विलोकन समिती विशिष्ट हेतू ठेवून स्थापन करण्यात आली असल्याने ती बरखास्त करण्यात यावी, फुले आंबेडकरी साहित्यिक मेळाव्याला प्रतिवर्षी मुख्यमंत्री निधीतून अनुदान देण्यात यावे, अंधश्रद्धा व मूलतत्त्ववादाला खतपाणी घालणाऱ्या दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांवरील मालिका त्वरित बंद कराव्यात, समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या मूल्यशिक्षणावर आधारित नवा अभ्यासक्रम तयार करावा, डॉ. आंबेडकरांच्या साहित्याचा मराठीत अनुवाद करून ते स्वस्त किंमतीत उपलब्ध करून द्यावे, शिक्षक दिन हा सावित्रीबाई फुले या पहिल्या भारतीय शिक्षिकेच्या जन्मदिनी पाळण्यात यावा, दहावीपर्यंतचे शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे, खासगीकरणाचे तत्वज्ञान बेकारी वाढवणारे असल्याने ते केंद्र व राज्य शासनाने रद्द करावे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती ही महागाई निर्देशांकाशी निगडीत करावी, बी. एड. प्रशिक्षणावरील फी मागासवर्गीयांवर अन्याय करणारी असल्याने ती त्वरेने रद्द करण्यात यावी, पंचायतराज व्यवस्थाच बरखास्त करण्याची मागणी असताना समाजविकास योजनांची खाती शासकीय यंत्रणेकडून काढून त्यांचे प्रशासन पंचायतराज व्यवस्थेकडे सोपवण्याचा राज्यशासनाचा प्रस्ताव मागे घेण्यात यावा वगैरे ठराव मंजूर झाले.

मेळाव्याचे अध्यक्ष प्रा. महेंद्र भवरे यांनी सामाजिक समरसता मंच व प्रतिभा संगमच्या व्यासपीठावर जाणाऱ्या साहित्यिकांवर टीकेची झोड उठवली. फुले आंबेडकरी विचाराच्या विविध साहित्यप्रवाहांचा आढावा घेताना या साहित्याची अंत:प्रेरणा या महात्म्यांचा मूळ विचारस्रोत असल्याचे सांगितले. साहित्यिक व विचारवंत राजा ढाले यांनी दलित हा शब्द टाकून देण्याचा विचार मांडला. ढाले म्हणाले, इतिहासाची पूजा करून गुलामगिरीचा इतिहास आपण मिरवणार आहोत काय? त्यापेक्षा नवा इतिहास, नवा माणूस आणि त्याची नवी मानसिकता घडवण्याचे कार्य आपण हाती घेतले पाहिजे.

या मेळाव्याला बाबूराव बागूल, डॉ. शांताबाई दाणी, चित्रपट अभिनेता अशोक लोखंडे, प्रा. अविनाश डोळस, राज्यमंत्री ए. टी. पवार, महापौर शोभा बच्छाव, आदि मान्यवर उपस्थित होते. मेळाव्याअगोदर शहरातून प्रबोधन रॅली काढण्यात आली.

संमेलनाचे अध्यक्ष प्रा. भवरे हे मूळचे विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील मोहदीचे असून, औरंगाबाद येथे महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच ते सामाजिक व साहित्य चळवळीत सक्रिय झाले. 'चिंताक्रांत मुलखाचे रुदन' या काव्यसंग्रहाला पुरस्कार लाभले आहेत. 'समकालीन दलित कविता' हा समीक्षाग्रंथ प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. प्रा. भवरे हे सध्या पालघरच्या सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात मराठीचे अध्यापक आहेत.

## 'कौंतेय-राधेय'चे प्रकाशन

ग्रंथाली वाचक चळवळीच्या पुढाकाराने हाती घेण्यात आलेल्या सहस्रक ज्ञानयज्ञ या

प्रकल्पातील 'कौंतेय-राधेय' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांच्या हस्ते झाले. हे पुस्तक दत्तक या विषयावर आधारित आहे.

पुस्तकाच्या लेखिक माधवी हेगडे– करंदीकर यांनी सांगितले की, जुलै २००० मध्ये भारतातील ख्रिश्चन धर्मातील पहिले मूल दत्तक देण्यात आले. यासंदर्भात न्या. एफ. आय. रिबेरो यांनी मुंबई न्यायालयात दिलेले निकालपत्र ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. भारतात आजपर्यंत केवळ हिंदू दत्तक कायदा अस्तित्वात होता. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालामुळे अन्य धर्मीयांनाही दत्तक घेणे शक्य होणारे आहे, ज्ञानयज्ञ प्रकल्पांतर्गत यापूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकांच्या लेखिका मृणालिनी जोगळेकर, संध्या जोशी, शुभदा पटवर्धन या लेखिकांच्या मुलाखती यावेळी घेण्यात आल्या.

## 'फिअरलेस माइंड' चे प्रकाशन

संघटनाबांधणीवरील अनुभवसंपन्न शास्त्रशुद्ध माहिती देणारे 'फिअरलेस माइंड' हे पुस्तक सामाजिक चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रकाश बाळ यांनी केले. विवेक पंडित यांनी हे पुस्तक लिहिले आहे. विवेक पंडित म्हणाले की, श्रमजीवी संघटना आणि मानवी हक्क अभियान या संस्थांच्या २० वर्षांच्या चळवळीचे सार म्हणजे हे पुस्तक आहे. त्यावेळी डॉ. मेरी अल्फान्स, जॉन सॅम्युअल, प्रा. अंजी कानिटकर आदी उपस्थित होते.

## दया पवार याच्या स्मरणार्थ कवी संमेलन

प्रसिद्ध साहित्यिक दया पवार यांच्या चौथ्या स्मृतीदिनानिमित्त पर्याय संघटनेच्या वतीने गोरेगावच्या केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या सभागृहात कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. संमेलनाचे अध्यक्ष कवी सतीश काळसेकर होते. कवयित्री मलिका अमर शेख यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. कवी अरुण म्हात्रे, सौमित्र, अशोक नायगावकर, निरजा, प्रा. प्रज्ञा लोखंडे, सिसिलिया कार्व्हालो, उषा अंभोरे, छाया कोरगावकर, निरंजन उजगरे, शाहीर संभाजी भगत, विवेक मोरे, भीमसेन देठे, कांताराम सोनवणे, राजन साटम, परेन जांभळे, याकुब राही आदी सहभागी होते.

दया पवार यांच्या चाली लावलेल्या कविता विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्यावतीने कार्यक्रमात सादर करण्यात आल्या. ठाणे जिल्ह्यातील काही आदिवासी कवीही या कार्यक्रमात सहभागी झाले.

## अंजली कीर्तने यांच्या 'कॅलिडोस्कोप' पुस्तकाचे प्रकाशन

श्रीमती अंजली कीर्तने यांच्या 'कॅलिडोस्कोप' या प्रवासवर्णनपर पुस्तकाचे प्रकाशन केसरी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. स्वत:ची खास शैली व सकारात्मक दृष्टी असलेल्या लेखिकेचे हे पुस्तक आदर्शवत ठरेल, असे त्यांनी गौरवोद्गार काढले. तर प्रवासी मनाच्या या लेखिकेचे वैचारिक क्षितिज खूप विशाल असून जीवनाकडे पाहण्याची दृष्टीही विलक्षण आहे, असे डॉ. रवी बापट म्हणाले, 'लोकप्रभा' या साप्ताहिकाचे संपादक प्रदीप वर्मा आणि 'लोकसत्ता' दैनिकाचे



सहसंपादक शरद कारखानीस यांचीही भाषणे झाली. आशा साठे यांनी या पुस्तकातील 'मित्रवर्य ॲमस्टरडॅम' या लेखाचे वाचन केले. हे पुस्तक मुंबई नगरीला अर्पण केले आहे. नवचैतन्य प्रकाशनाचे शरद मराठे यांनी स्वागत तर शोभा नाखरे यांनी सूत्रसंचालन केले.

## 'मुलखावेगळे छांदिष्ट'चे प्रकाशन

मुंबई येथील नवचैतन्य प्रकाशनाच्या अशोक बेंडखळेलिखित 'मुलुखावेगळे छांदिष्ट' या पुस्तकाचे प्रकाशन नामवंत कथालेखिका व समीक्षक प्रा. डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या हस्ते झाले.त्या म्हणाल्या,''छांदिष्ट व्यक्तींच्या परिचयाबरोबरच बेंडखळे यांनी त्या त्या व्यक्तीची इतर माहिती अलिप्तपणाने दिल्यामुळे लेख रुक्ष न होता रंजक झाले आहेत. आजचा जीवनक्रम बेसूर व विघातक होत असताना जीवनात रमणाऱ्या छांदिष्टांना भेटणे ही चांगली गोष्ट आहे.''

कथालेखक सुमेध वडावाला-रिसबुड, प्राचार्य डॉ. सुधीर पानसे यांचीही भाषणे झाली.

## साहित्य संस्कृती मंडळ

मराठी साहित्याचा इतिहास सामाजिक-राजकीय-आर्थिक स्थितीगतीच्या संदर्भात लोकांपुढे यावा या उद्देशाने मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या पुनर्लेखनाचा प्रकल्प मराठी साहित्य संस्कृती मंडळाने हाती घेतला आहे.

मराठी साहित्याचा इतिहास केवळ ग्रंथाचा इतिहास न राहता समाजजीवनात आलेल्या वळणांची याला जोड मिळावी, असा या प्रकल्पाचा हेतू असून अशा प्रकारे पुनर्लेखन करण्याचा हा देशातील पहिलाच प्रकल्प असावा. या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यापूर्वी महाराष्ट्रातील चार विद्यापीठांतर्फे अभ्यासक व तज्ज्ञांची चर्चासत्रे आयोजित केली जाणार असून प्रत्येक क्षेत्रातील जाणकारांना यात सहभागी करून घेतले जाईल.

मंडळाच्या इतर उपक्रमाची माहिती देताना अध्यक्ष सुरेश द्वादशीवार म्हणाले, की सहकारी साखर संघाच्या मदतीने दोन हजार रुपयात १०० पुस्तके देण्याची योजना असून ग्रंथालीचे श्री. दिनकर गांगल यांच्याकडे त्याची जबाबदारी असेल. लीळाचरित्रापासून, माडखोलकरांच्या अग्रलेखांपर्यंत ते केशवसुतांच्या कवितेपासून माझी जन्मठेपपर्यंत मराठीतील १०० निवडक पुस्तके देण्याची ही योजना आहे. 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेअंतर्गत, महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ७५ थोर व्यक्तींची चरित्रे प्रकाशित करण्यात येतील. वीर वामनराव जोशी, ताराबाई शिंदे, आचार्य विनोबा भावे, ना. भा. खरे, स्वामी रामानंद तीर्थ, कॉ. डांगे, जगन्नाथ शंकरशेठ, एस. एम. जोशी अशा महान लोकांची चरित्रे या योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिली जातील.

नवलेखक अनुदान योजनेचे सुलभीकरण करण्यात आले असून पुस्तकांचा दर्जा, छपाई, मोबदला याबाबत निश्चित धोरण तयार करण्यात आले आहे.

ज्ञानेश्वरीच्या सिंधी भाषेतील अनुवादासाठी प्रा. लच्छमन हर्दवाणी यांना २० हजार रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. याशिवाय राज्यातील शेतीचा इतिहास, साखर कारखानदारीच्या विकासावरील पुस्तके मंडळातर्फे काढली जाणार आहेत.

ग. त्र्यं. माडखोलकर याच्या जन्मशताब्दीनिमित्त व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व या ग्रंथाचे प्रकाशन नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात केले जाणार असून प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय योजनेअंतर्गत प्रकाशित व्हावयाच्या खंड चारमधील 'हिंदुत्व' या पुस्तकाचे त्याच्या पुण्यतिथीदिनी म्हणजे २० नोव्हेंबरला केले जाणार आहे.

यंदा डॉ. यू. म. पठाण (औरंगाबाद), श्रीमती नलिनी पंडित यांना १९९९-२००० सालासाठी तर श्री. शंकरराव खरात, शिवाजी सावंत (पुणे) यांना २०००-२००१ सालासाठी गौरववृत्ती जाहीर करण्यात आल्या असून लोकांच्या इच्छेनुसार त्यांच्या गावी जाऊन ती प्रदान करण्यात येईल.

## इंदिरा संत यांना काव्यमय श्रद्धांजली

कवयित्री इंदिरा संत यांना अक्षरगंधतर्फे काव्यमय श्रद्धांजली वाहण्यात आली.

साहित्य अकादमी, जागतिक मराठी अकादमी आणि फाटक ग्रंथसंग्रहालय,पार्ले यांच्या विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. इंदिरा संत यांच्या वाङ्मयीन आठवणी या वेळी अक्षरगंधच्या मधुवंती सप्रे यांनी सांगितल्या व 'शेला' ते 'निराकार' या नऊ कवितासंग्रहातल्या निसर्ग, भाव, प्रेम कविता, भास कविता, स्त्रीविषयक कविता आणि विनोदी कविता सादर केल्या. इंदिरा संतांच्या 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहाला 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार मिळाला होता. म्हणून या कार्यक्रमात साहित्य अकादमी सहभागी झाली होती. साहित्य अकादमीचे प्रकाश भातंब्रेकर, ज्येष्ठ लेखक रवींद्र पिंगे, कवि नीलेश पाटील, जागतिक मराठी अकादमीचे शशी भालेकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

अक्षरगंधतर्फे कवितेची चळवळ चालवली जाते. त्याचा एक भाग म्हणून अक्षरगंधने यापूर्वी कवितेच्या माध्यमातून कोकणातल्या 'वसुंधरा' या शैक्षणिक प्रकल्पाला आर्थिक मदत केली. फाटक ग्रंथ संग्रहालयाच्या श्रीमती पद्मजा जोग यांनी प्रास्तविक केले.

## 'काँटिनेंटल बुक सर्व्हिस'चे अनिल पाटणकर यांचे निधन

काँटिनेंटल बुक सर्व्हिसचे मालक अनिल गोपाळ ऊर्फ राजाभाऊ पाटणकर (वय ५८) यांचे दि. काल दिनांक ९ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे आई, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

श्री. पाटणकर चाळीसहून अधिक वर्षे प्रकाशन व्यवसायात होते. या कालावधीत मान्यवर लेखकांची दोनशेहून अधिक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. कथा, कादंबऱ्या, ललित साहित्य त्याबरोबरच शालेय क्रमिक पुस्तकांची निर्मिती हे काँटिनेंटल बुक सर्व्हिसचे वैशिष्ट्य होते.

## साहित्य संस्कृती मंडळाचे नवे अध्यक्ष- प्रा. रा. रं. बोराडे

सुरेश द्वादशीवार यांनी साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने त्यांच्या जागी औरंगाबादचे साहित्यिक रा. रं. बोराडे यांची नियुक्ती केल्याची घोषणा शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे यांनी १ नोव्हेंबर २००० रोजी केली.



# पुरस्कार

## आदिशक्ती पुरस्कार

''पुण्यात जेवढ्या स्त्रीविषयक चळवळी झाल्या तेवढ्या भारतात कोठेही झाल्या नाहीत,'' असे 'लोकसत्ता'चे मुख्य संपादक डॉ. अरुण टिकेकर यांनी बन्सीलाल रामनाथ आगरवाल आदिशक्ती पुरस्कार वितरण प्रसंगी सांगितले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर होते. प्रा. लीला अर्जुनवाडकर, अरुणा ढेरे, स्वाती चव्हाण, निर्मला मुकुंद सोवनी, हर्षदा श्रीधर जोशी, छबूताई देवदास सुरवसे, डॉ. दीप्ती दिलीप देवबागकर, सुखदा धनंजय साने यांना यंदाचा आदिशक्ती पुरस्कार देण्यात आला. रत्नागिरी जिल्ह्यातील चिखलीच्या लोकमान्य सार्वजनिक धर्मादाय न्यास या संस्थेला संस्था पुरस्कार देण्यात आला.

डॉ. टिकेकर म्हणाले, ''समाज बदलत नाही, असे मानणे बरोबर होणार नाही. त्याची स्वतःची एक गती असते. या गतीचे परिवर्तन होत असते. एका रात्रात क्रांती व्हावी, अशी अपेक्षा करणे बरोबर होणार नाही. स्त्रीशिक्षणाची चळवळ पुण्यात सुरू झाली. दोन महिलांनी ही चळवळ सुरू केली. त्यातील सावित्रीबाई फुले यांची सर्वांना माहिती आहे. सावित्रीबाईंच्या जोडीने फ्रान्सिना वंतराना ही महिलाही या कामात अग्रेसर होती. गुजराती समाजात जन्मलेल्या या महिलेने पारशी समाजातील पुरुषाशी लग्न केले आणि या दोघांनीही ख्रिश्चन धर्म स्वीकारला. या दोघींच्या या प्रयत्नांनी पुण्यात स्त्रीशिक्षणाची चळवळ रुजली. यानंतर पुण्यातील महिलांनी मागे वळून पाहिले नाही. पहिले पुरोगामी पाऊल पुण्यातील महिलांनी टाकले. पुण्यात जेवढ्या स्त्रीविषयक चळवळी झाल्या तेवढ्या देशात कोठेही झाल्या नाही. स्त्रीवादी चळवळीच्या कार्यकर्त्या मात्र पूर्वीचीच भाषणे करीत राहतात.''

अध्यक्षपदावरून कुवळेकर म्हणाले, ''धार्मिकतेला सामाजिकतेची जोड देत काम करणे हा सामाजिक बदलाचा भाग आहे. या ट्रस्टच्या वतीने राबविण्यात येणारे उपक्रम याच बदलाची उदाहरणे आहेत.''

पुरस्कार मिळालेल्यांच्या वतीने अरुणा ढेरे, स्वाती चव्हाण, सुखदा साने, डॉ. दीप्ती देवबागकर, प्रा. लीला अर्जुनवाडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बाळासाहेब अनास्कर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आनंद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. नगरसेवक शिवा मंत्री यांनी आभार मानले.

## साहित्य सम्राट केळकर पुरस्कार

नव्या शतकात नव्या व्यवस्थेचा स्वीकार करताना जुन्या परंपरेशी आपला धागा जोडला गेला आहे, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. साहित्यसम्राट न. चिं. केळकर हे असे व्यक्तिमत्व होते, असे मत ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांनी 'केसरी'तर्फे देण्यात येणाऱ्या न. चिं. केळकर स्मृती पुरस्कार वितरणप्रसंगी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी जयंतराव टिळक होते.

केळकर पुरस्कार पत्रकार अरविंद गोखले यांना 'आयसी ८१४' या कादंबरीसाठी तर डॉ. अभय बंग यांना 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या पुस्तकासाठी देण्यात आला. तीन हजार रुपये व प्रशस्तिपत्रक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

संपादक, लेखक, वक्ता, विचारवंत अशा विविध भूमिकांमधून तात्यासाहेब केळकरांनी विपुल साहित्यनिर्मिती केली. वाचकांवर संस्कार करणारे त्यांचे लेखन होते. शैली सहज, सोपी होती. चपखल उदाहरणे ते देत असत. सर्व साहित्यप्रकारांविषयी त्यांना प्रेम होते. नव्या पिढीविषयी आस्था होती, असे सांगून त्या पुढे म्हणाल्या, 'सर्जनशीलता आणि परिश्रम यांच्यातील दुवा केळकरांच्या व्यक्तिमत्त्वात सुंदर रीतीने जोडला गेला होता.'

## अरुणचंद्र गवळी यांना वसंत सावंत काव्यपुरस्कार

सिंधुदुर्ग साहित्य संघातर्फे देण्यात येणाऱ्या 'वसंत सावंत काव्यपुरस्कारा'साठी अरुणचंद्र गरळी यांच्या कवितासंग्रहाची निवड झाली आहे. कवी दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या हस्ते सावंतवाडी येथे सिंधुदुर्ग कोजागरी कविसंमेलनात हा पुरस्कार दिला गेला. कविसंमेलनाच्या वेळी प्रवीण बांदेकर यांच्या 'येरू म्हणे' या कवितासंग्रहाचे व हरिहर आठलेकर यांच्या 'क्रीतपुत्र' या कादंबरीचे प्रकाशन झाले. कादंबरीकार डॉ. रंगनाथ पठारे, डॉ. राजन गवस, कवयित्री सुमती लांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## निरंजन उजगरे यांना बी. रघुनाथ पुरस्कार

औरंगाबाद येथील परिवर्तन व नाथ सीड्स यांनी यंदाच्या बी. रघुनाथ पुरस्कारासाठी निरंजन उजगरे यांच्या 'जायंट व्हील' या कादंबरीची निवड केली आहे.

हा पुरस्कार ७ सप्टेंबरला बी. रघुनाथ यांच्या स्मृतिदिनी साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते देण्यात आला आहे. तीन हजार रुपये रोख देऊन उजगरे यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्कार निवड समितीत भारत सासणे, महावीर जोंधळे व प्रा. दासू वैद्य यांचा समावेश होता. बी. रघुनाथ पुरस्काराचे हे दहावे वर्ष असून यापूर्वी भास्कर चंदनशिव, रंगनाथ पठारे, नागनाथ कोत्तापले, फ. मु. शिंदे, भारत सासणे, नारायण कुलकर्णी, नारायण कवठेकर आदींना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

## विजय तेंडुलकर यांना विष्णुदास भावे पुरस्कार

ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांना यंदाचा 'विष्णुदास भावे नाट्यपुरस्कार' पाच नोव्हेंबरच्या मराठी रंगभूमी दिनी नाट्यपंढरी सांगलीमध्ये समारंभपूर्व दिला गेला.

सामाजिक आशयाच्या आणि रंगभूमीवरील प्रयोगशील अंगांना न्याय देणाऱ्या मराठी तेंडुलकरांनी हिंदी व अन्य भारतीय भाषांनाही मराठी नाटकाचे वैभव दाखवून दिले. या कर्तृत्वाची पावती म्हणून आद्य मराठी नाटककार विष्णुदास भावे यांच्या नावाचा पुरस्कार श्री. तेंडुलकर यांना देण्यात येत आहे, अशी माहिती 'महाराष्ट्र राज्य नाट्य विद्या मंदिरा'च्या पुरस्कार समितीचे अध्यक्ष शरद कारळे यांनी दिली. प्रथेप्रमाणे, अ. भा. मराठी नाट्यसंमेलनाचे विद्यमान अध्यक्ष लक्ष्मण देशपांडे हेही उपस्थित होते.

## ज्येष्ठ पत्रकारांना पुरस्कार

### सनसनाटी लिखाणाऐवजी पत्रकारांनी समाज जोडण्याचे काम करावे

वाचनाची आवड निर्माण करण्याचे काम पत्रकार करीत असतो. त्यामुळे पत्रकारांनी सनसनाटी, चटपटीत लिखाणाऐवजी वाचक घडविण्याचे आणि पर्यायाने समाज जोडण्याचे काम करावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी मुंबई येथे केले.

पत्रकारितेच्या क्षेत्रातील प्रदीर्घ व उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे प्रतिवर्षी देण्यात येणारा यंदाचा 'पुढारीकार पद्मश्री ग. गो. जाधव पुरस्कार' बेळगाव तरुण भारतचे वृत्तसंपादक, ज्येष्ठ पत्रकार ग. गो. राजाध्यक्ष यांना तर १९९८-९९ चा पुरस्कार मुंबई सकाळचे संपादक राधाकृष्ण नार्वेकर यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रोख २५ हजार रुपये आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

देशमुख आपल्या भाषणात म्हणाले की, पत्रकारिता करीत असताना आपल्या लिखाणातून तणाव निर्माण होऊ नये, त्याचप्रमाणे समाजात वितुष्ट निर्माण होऊ नये याची पत्रकारांनी काळजी घेणे आवश्यक आहे. रचनात्मक कार्य करण्याचा, लोकांची मने जोडण्याचा ध्यास त्या काळातील संपादकांनी घेतला होता, ती पत्रकारिता जतन करण्याचे काम ग. गो. जाधव यांच्यासारख्या ध्येयवादी पत्रकारांनी केले आणि आज श्री. नार्वेकर आणि राजाध्यक्ष तीच परंपरा समर्थपणे पुढे नेत आहे. सर्वसामान्यांसाठी झटताना पत्रकार मात्र स्वत: काहीसा बेदखल असतो. आपणास कायम प्रसिद्धीच्या झोतात ठेवण्याचे, वातावरण निर्मिती करण्याचे काम पत्रकारांनी केले. पत्रकारांनी दिलेल्या प्रसिद्धीमुळेच आपण आज मुख्यमंत्रीपदावर आहोत, असे नमूद केले. समाजासाठी सदैव कार्यरत असणाऱ्या पत्रकारांच्या कार्याची दखल अशा स्वरूपाच्या पुरस्कारामुळे घेतली जाते आणि समाजाचीही दुसऱ्याच्या कार्याप्रती दखल घेण्याची भावना प्रबळ होते, असे त्यांनी सांगितले.

राधाकृष्ण नार्वेकर यांनी, पत्रकारितेचे सध्याचे बदलते स्वरूप पाहता पत्रकारितेचा मूळ उद्देश, आत्माच हरवून बसला आहे की काय, असा उद्वेगजनक सवाल केला. श्री. ग. गो. राजाध्यक्ष यांनी सीमाप्रश्न सोडविण्याबाबत पुढारी तोंडदेखली सहानुभूती दर्शवितात पण कारवाई करावयास कचरतात, अशी खंत व्यक्त केली.

## डॉ. रवीन्द्र ठाकूर यांच्या संशोधन प्रकल्पास अनुदान

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक डॉ. रवीन्द्र ठाकूर यांच्या 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समालोचन' या बृहत्-संशोधन प्रकल्पास विद्यापीठ अनुदान आयोगाचे तीन लाख रुपयांचे भरघोस संशोधन अनुदान प्राप्त झाले आहे. संपूर्ण मराठी कादंबरीवाङ्मयाचे सामाजिक दृष्टीने परिशीलन व समाजशास्त्रीय समालोचन करणे हे या संशोधन प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

यापूर्वी डॉ. ठाकूर यांनी '१९७५ नंतरची मराठी कविता : प्रवृत्ती आणि प्रवाह' हा लघुसंशोधन प्रकल्प पूर्ण केला असून, त्यासही विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे संशोधन अनुदान प्राप्त झाले होते.

डॉ. ठाकूर हे गेली २२ वर्षे अध्यापनक्षेत्रात आहेत. महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, यशवंतराव चव्हाण कॉलेज, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी अध्यापन केल्यानंतर ते गेल्या आठ वर्षांपासून शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात अध्यापन व संशोधन करीत आहेत. त्यांनी 'मराठी ग्रामीण कादंबरी', 'प्रवाह आणि प्रतिक्रिया', 'आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय', 'साहित्य : समीक्षा आणि संवाद' इत्यादी अनेक समीक्षाग्रंथ लिहिले असून, महात्मा जोतिराव फुले यांच्या कवितेचे 'क्रांतिजागर' हे संपादन केले आहे.

## शब्दकोडे

रचनाकार - **मनोहर बांदेकर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दी | स | हं | म | स्त्री | कि | शो | र |
| पा | म | नः | श | क्ती | र | हे | मा |
| व | ग्रा | ता | त्रा | ज | ल | र्मि | कु |
| ली | यु | ह | अं | लो | क | लि | त |
| षी | वा | त | क | मौ | क | सा | स |
| छा | र्ना | प्र | ज | हि | म | स | ई |
| द | भा | वा | जी | ना | त | का | त्ता |
| मी | आ | ता | क्ष | द | दी | ळ | प |

शेजारील चौकोनात २४ दिवाळी अंकांची नावे दडलेली आहेत. ती ओळखा व बक्षीस मिळवा. बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून येणाऱ्या पहिल्या तीन स्पर्धकांना आपल्या पसंतीचे प्रत्येकी १०० रुपयांचे पुस्तक बक्षीस.

**मुदत - १६ डिसेंबर २०००**

आमचा पत्ता - **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १२१६ सदाशिव पेठ, पुणे- ३०




**पुस्तक परिचय**

# आठवणींचा मोहर

## श्लील-अश्लीलतेच्या सीमारेषा स्पष्ट करणारे न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे

**राजाभाऊ गवांदे**




निवृत्त न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे यांनी आपल्या आयुष्यातील वेचक घटनांच्या निवेदनासाठी 'आठवणींचा मोहर' हे सदर सामनामध्ये लिहिले. त्या ५२ लेखांचे संकलन आता संकल्पित द्विखंडीय आत्मचरित्रपर लेखनाचा पहिला खंड म्हणून मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध होत आहे. ख्यातनाम लेखिका दुर्गा भागवत यांनीच आठवणींचा मोहर हे नाव सुचवले. 'राजाभाऊंच्या आयुष्यात खूप तोलामोलाची माणसे येऊन गेलेली आहेत. राजाभाऊंच्या जुन्या-नव्या आठवणी म्हणजे महाराष्ट्राचा आणि या मराठी संस्कृतीचा एक भरजरी रेशमी पदर आहे. जमिनीतील कारंजी उफाळून वर यावीत, तशा राजाभाऊंच्या बोलण्यातून आठवणी उफाळून येतात. त्यांच्या बोलण्यात एक अंतःस्थ पाझरणारा जिव्हाळा आहे.. 'एक न्यायप्रिय, कविमनाचा न्यायाधीश आपल्या आयुष्यातल्या घटनांकडे, स्वतः त्यात गुंतूनही, किती तटस्थपणे हे सारे अनुभवतो आहे, हे जाणून घेताना मला वाटले की या केवळ आठवणी नाहीत तर माणुसकीने ओथंबून आलेल्या सत्य घटना संवादी, लडिवाळ अशा अनलकृत भाषेतून प्रकट झाल्या आहेत.''

राजाभाऊंना प्राध्यापक वा संपादक व्हायचे होते; समाजकारणात राजकारणात त्यांना रस होता. पण ते झाले वकील– न्यायाधीश, अर्थातच मानवी स्वभावाचे विविध पैलू राजाभाऊंना पाहायला मिळाले. जगण्याचा परिसर बदलला. कुटुंबाचा परिसर, शाळामहाविद्यालयाचा परिसर, नोकरी-व्यवसायामुळे बदलणारा परिसर आपण व भोवतीचा परिसर यात एक नाते निर्माण होते. ते कळतनकळत उत्कट होत जाते. त्यात सुखदुःख, साफल्यवैफल्य यांचे ताणेबाणे गुंफले जातात. आत डोकावून बघितले तर अंतर्विश्वाचा प्रत्यय येतो. बाहेर बघितले की बाह्यविश्वाचा प्रत्यय येतो. या दोहोंमध्ये कुठेतरी आपल्याला स्वतःचे रूप कमी-जास्त दिसते. त्याबद्दल सांगावेसे वाटते. आयुष्यात योगायोगाने अनेक चांगली माणसे भेटतात; ती आपले जीवन समृद्ध करतात. घडवतात. त्यांच्याबद्दल लिहावेसे वाटले म्हणून राजाभाऊंनी या आठवणींचे शब्दांकन करायला प्रारंभ केला.

राजाभाऊ अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगावचे. १९४८ मध्ये ते एस.पी. कॉलेजमध्ये बी.ए साठी दाखल झाले. १९५२ मध्ये एलएलबी झाले. पुण्यात त्या वेळी रामराव आदिक, प्रा. लक्ष्मणराव कुरकुरे, वसंतराव पवार (शरद पवारांचे मोठे बंधू), बापू काळदाते, मुकुंद थत्ते

(यदुनाथजींचे धाकटे बंधू), वगैरे सहाध्यायी होते. १९४८ मध्ये भाऊसाहेब शिरोळे यांच्या घरी शेतकरी कामगार पक्षाचा नारळ फुटला. शंकरराव मोरे यांचा त्यांच्यावर लोभ जडला. शिंदे आळीतील बापूसाहेब जोशी यांच्या नृसिंहसदनात काही काळ ते राहिले. महात्मा गांधीजी या वास्तूत राहून गेलेले, म्हणून शंकरराव मोरे त्या वास्तूबद्दल आदराने बोलत, प्रख्यात विचारवंत दि.के. बेडेकर यांचीही तेथेच गाठ पडली. शेजारी सावकार वायंगणकर राहत. ते जुन्या आठवणी सांगत. ते सारस्वत तर त्यांच्या पत्नी कायस्थ. प्रेमविवाह. त्याकाळी खळबळ उडवणारा. शंकरराव मोरे यांना राजाभाऊ दाजी म्हणत. ते जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते, खासदार होते. फटकळ व शीघ्रकोपी स्वभावाचे दाजी अखेरपर्यंत भाड्याच्या घरात राहिले. प्रॅक्टिस अँड प्रोसिजर ऑफ इंडियन पार्लमेंट हा त्यांचा ग्रंथ गाजला. शेवटी मात्र ते दैववादाकडे झुकत गेले; याचे राजाभाऊंना आश्चर्य वाटते.

आरंभीच्या काही प्रकरणात १९६४ मध्ये 'श्यामा' या चंद्रकांत काकोडकरांच्या कादंबरीवर अश्लीलतेचा खटला भरण्यात आला होता. ती कादंबरी रंभा मासिकात आली म्हणून रंभाचे संपादक दीनानाथ पै, लेखक काकोडकर व पुण्यातील विक्रेते भुतडा या तिघांविरुद्ध हा खटला होता. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, माधव मनोहर, डॉ. पुरोहित, ना. सी. फडके, आचार्य अत्रे, वगैरेंच्या साक्षी झाल्या. आरोपींचे वकील मधुकर परांजपे व सुशील कवळेकर तर सरकारी वकील बाबा भिडे. ह्या खटल्याचा निकाल न्या. राजाभाऊ गवांदे यांनी १९६५ मध्ये दिला. आरोपींना निर्दोष सोडले.

या निकालावर आचार्य अत्रे यांनी 'मराठा'मधून तीन लेखांद्वारे झोड उठवली. सरकारने अपील केले. मुंबई उच्चन्यायालयाने दीनानाथ पै व काकोडकर यांना प्रत्येकी २५ रुपये दंड ठोठावला. तेव्हा काकोडकरांनी सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लीव्ह अपील केले आणि १९६९ मध्ये सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाचा निकाल फिरवून आरोपींना दोषमुक्त करण्याचा न्या. गवांदे यांचा निवाडा कायम केला. राजाभाऊंच्या निकालावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले व मराठीतील उठसूट अश्लीलतेविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांची तोंडे बंद झाली. काकोडकरांनी ललितमध्ये या खटल्याची हकीकत सांगणारा लेख लिहिला. ''दहा हजार रुपये खर्च करून अखेर दंडाचे पंचवीस रुपये सरकारकडून परत घेतले. त्यामागे माझा मनस्ताप आहे. ॲड. सुशील कवळेकरांची जिद्द आहे आणि संपूर्ण मराठी साहित्याची इज्जत आहे.'' श्लील-अश्लीलतेच्या मर्यादा स्पष्ट करणारे न्या. राजाभाऊ गवांदे यांचे निकालपत्र आजही महत्त्वपूर्ण मैलाचा दगड म्हणून न्यायाक्षेत्रातच मानले जाते. त्यांचा निकाल फिरवणारे मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश मधुकर परांजपे यांना पुढे एकदा राजाभाऊ म्हणाले, ''माझा निकाल फिरविण्याचे ऐतिहासिक कार्य करण्यासाठीच जणू आपण मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाला होता.'' तेव्हा न्या. परांजपे यांनी उत्तर दिले, ''ते काहीही असो. एक गोष्ट स्पष्ट आहे. तुमच्या विचारसरणीशी सर्वोच्च न्यायालय सहमत असते.''

एकदा शहनाई वादक बिस्मिलाखान त्यांच्या घरी आले. भारत लॉजमध्ये बिस्मिलाखान यांच्या भोजनाची व्यवस्था करताना त्यांचे जे दर्शन झाले तेही राजाभाऊंनी उत्तम रेखाटले आहे. ''जजसाब, हमे तो कुछ लागत नाही. हमे तो ठहरे नमाजी आदमी. कभी घनी घना, कभी मुठ्ठीभर चना, कभी वह भी मना. अल्लाह मेहरबान है. वह जैसे रखेगा उसीमे खुश रहना चाहिये.''

नूतन मराठीच्या प्रांगणात त्यांचा कार्यक्रम सुरू होण्याच्या वेळीच विजा कडाडून मुसळधार पाऊस सुरू झाला. गोंगाट-गोंधळ. श्रोत्यांची धावपळ. तेव्हा बिस्मिलाखान न्यायमूर्ती गवांदे यांना म्हणाले, ''जजसाब, डर गये क्या? बिल्कुल मत घबराइए। मै अभी शहनाई बजाना शुरू कर देता हूँ और ऐसी धून बजाता हूँ की जो जहाँ है वही खडा रहेगा।। और फिर आप मालिकसे कहिये– बरसो, चाहे जितना बरसो.''

आश्चर्य म्हणजे बिस्मिल्लांनी शहनाई वाजवण्यास सुरुवात केली आणि श्रोते टाळ्या वाजवत होते तेथेच उभे राहिले. आकाशातून पडणारा पाऊस आणि खांसाहेबांच्या सनईतून निघणारे सूर यांची अर्धा तास जुगलबंदी चालली. नंतर पाऊस थांबला. रात्री एकपर्यंत ती मैफल चालली.

राजाभाऊ अहमदनगरच्या मॉडार्न हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. त्यांना रावसाहेब पटवर्धन व बाळासाहेब भारदे यांनी मदत केली. पुढे कॉलेज शिक्षण कसे घ्यायचे हा प्रश्न होता. सानेगुरुजींनी त्यांना पुण्याला एसपीमध्ये जाण्याचे सुचवले आणि प्राचार्य मामासाहेब दांडेकर यांना एक पत्रही दिले. सानेगुरुजींचे पत्र बघून प्राचार्य म्हणाले, ''फार मोठ्या माणसांनी तुमच्याबद्दल चांगले लिहिले आहे. सानेगुरुजींच्या पत्रातील शेवटचे वाक्य आहे– याला मदत म्हणजे पात्रे कृपा. तुमच्यासाठी मी काय करू ते सांगा.'' सोनोपंतांनी राजाभाऊंना पूर्ण फी माफी दिली. वसतिगृहात राहण्याची व्यवस्था करण्याचीही तयारी दाखवली. खर्चासाठी वीस रुपये दिले. राजाभाऊंनी तत्त्वज्ञान हा विषय घेतला. राहण्याची व्यवस्था अन्यत्र झाली. मामासाहेबांचे पंढरपूरच्या वाळवंटातील कीर्तन त्यांनी बघितले. त्यांचे तेथील ऐश्वर्य पाहून राजाभाऊ थक्क झाले. मात्र त्यांनी राजाभाऊना म्हटले, ''हंगामी वारकरी होऊ नका.''


राजाभाऊंना काही आध्यात्मिक अनुभवही आले. फलज्योतिषाचाही त्यांचा अभ्यास एकेकाळी चांगला होता. बाळासाहेब नेऊरगावकर उत्तम ज्योतिष सांगत. ते म्हणत, ''स्वामी समर्थ आणि दत्तात्रेय यांच्या आशीर्वादामुळे मला हे सारे सांगता येते चित्रपट पाहावा तसे प्रश्नकर्त्याचे भावी जीवन मला दिसते. ही त्यांची कृपा आहे...'' बाळासाहेबांनी खंडाळा येथे जाऊन दासगणू महाराजांचे दर्शन घेतले. तेव्हा महाराजांनी म्हटले, ''काय पाहिजे ते मागा.'' त्यावर नेऊरगावकरांनी म्हटले, ''आपण मला काय देणार? मला आपणाकडून काहीही नको. मी केवळ आपल्यासारख्या संतपुरुषाचे दर्शन घेण्यासाठी आलो. देण्याचीच गोष्ट असेल तर मला देण्यासाठी स्वामी व गुरुदत्त समर्थ आहेत.'' तेव्हा दासगणू महाराज त्यांना प्रसाद म्हणून नारळ व हार देतात.

शर्टाच्या ओटीत नारळ-हार घेतल्यावर काही काळ बाळासाहेबांना समाधीचा अनुभव आला. घरी आल्यावर एक बाई पक्षकार म्हणून समोर दिसली. तिने शंभर रुपयाची नोट वकील फी म्हणून दिली. पण ती नंतर कधीच दिसली नाही. 'न मागे तयाची रमा होय दासी' या उक्तीचा प्रत्यय आला. अशा अनेक आठवणी राजाभाऊंनी सांगितल्या आहेत.

गेल्या पन्नाससाठ वर्षातील अनेक महत्त्वपूर्ण घटना व व्यक्ती यांचे दर्शन या आठवणींमधून वाचकांना घडेल.

**पृष्ठे** २५८ **किंमत** : १६०रु. **सवलतीत** : १३६रु. **सभासदांना** : १२०रु. **पोस्टेज** :२०रु.

# आय्.सी ८१४ अपहरणाचे १७३ तास




## फ्लाइट आय्.सी.८१४ चे भिषण अपहरणनाट्य

**मूळ लेखक- नीलेश मिश्रा अनु. -लीना सोहोनी**

२४ डिसेंबर १९९९ रोजी नेपाळमधील काटमांडू येथील त्रिभुवन विमानतळावरून आयसी फ्लाइट ८१४ ने सव्वाचार वाजता दिल्लीकडे झेप घेतली. १५४ भारतीय, नेपाळी व इतर परदेशी नागरिक प्रवाशांमध्ये होते. तीन तास उशिरा ही एअरबस ३.०० वाजता सुटली असली तरी ८० मिनिटात दिल्लीला पोचून ख्रिसमसपूर्व संध्याकाळ कुटुंबियांसमवेत घालवण्याची स्वप्ने प्रवाशी पाहत होते.

विमानाचा कमांडर कॅप्टन देवीशरण, सहवैमानिक राजेंद्रकुमार गौड, फ्लाइट इंजिनिअर अनिल के जग्गिया, फ्लाइट पर्सर अनिल शर्मा, एअर होस्टेस कविता मुखर्जी, कल्पना मुजुमदार, रजनी शेखर, सपनाराणी मेनन, तपा देवनाथ असे कर्मचारी त्या विमानात होते.

खाद्यपदार्थ सर्व्ह करण्यात आले. लखनौ शहराच्या जवळ विमान आले. चाळीस मिनिटे उड्डाणाला झाली होती. प्रवाशांना चहा-कॉफी देण्यात आली. फ्लाइट पर्सर अनिल शर्मा चहाचा ट्रे घेऊन कॉकपटिमध्ये गेला. वैमानिकांना चहा देऊन बाहेर पडू लागला. त्याची पाठ प्रवाशांकडे झाली. त्या बेसावध क्षणी एक बुरखाधारी व्यक्ती त्याच्या मागे जाऊन उभी राहिलेली १ बी क्रमांकाच्या आसनावर बसलेल्या रमेश ग्रोव्हर याला दिसली. रमेशच्या हास्याला प्रतिसाद देत शर्माने मागे बघितले. तर मास्क घातलेला जाडजूड माणूस. शर्मावर एका हाताने पिस्तूल रोखून उभा. दुसऱ्या हातात बॉंब.

''हिलना नही. आम्ही या विमानावर कब्जा केला आहे.'' म्हणत कॉकपिटचा दरवाजा उघडून तो आत शिरला.'' कोईभी होशियारी नही करेगा, नही तो हम विमान उडा देंगे'' अशी धमकी त्याने दिली.

याच वेळी बिझिनेस क्लासमध्ये सनी अहमद काझी उठून प्रसाधन गृहात गेला. चेहरा झाकणारी माकडटोपी घालून बाहेर आला. ''हायजॅक'' असे ओरडला. प्रवासी गोंधळले.

इकॉनॉमी क्लासमधले तिघे हातातील शस्त्रे हवेत नाचवत उठले. सनी अहमद काझी बिझिनेस व इकॉनॉमी क्लास या मधील किचनपाशी गेला. एअरहोस्टेसला ढकलून हातातील बंदूक व बॉंब त्याने सर्वांना दाखवले. बऱ्याच प्रवाशांचे जेवण चालले होते. बुरखाधाऱ्यांची काहीतरी चेष्टामस्करी चाललीय एवढेच त्यांना दिसले. विमानाचे अपहरण झालेय हे त्यांच्या



लक्षात यायला अंमळ वेळच लागला. कॉकपिटमध्ये शिरलेला इब्राहिम अतार (चीफ), सनी अहमद काझी (बर्गर, महमद शकीर (शंकर), शहीद अख्तर सईद (डॉक्टर), झहूर इब्राहिम मिस्त्री (भोला) या पाच अतिरेक्यांनी अनेकदा रंगीत तालीम करून विमान हायजॅक करण्याची ही योजना आखली होती. आणि आता प्रत्यक्षातही आणून दाखवली होती....

भोला हातात सुरा घेऊन अनाउन्समेंट करतो, ''हे विमान आम्ही हायजॅक केले आहे. गुडघ्यात डोकी खाली घाला. जेवणाचे ट्रे खाली जमिनीवर ठेवा. जेवणाच्या टेबलाच्या घड्या घाला.''

प्रवाशांना आता कुठे काय चाललेय त्याचे गांभीर्य कळले. चौघे अपहरणकर्ते उभ्या पॅसेजमधून गस्त घालत. प्रवाशांना धमकावत होते. चीफने वैमानिकाला विमान लाहोरला घ्यायला सांगितले.

इंधन पुरणार नाही असे सांगूनही वैमानिकाला ते लाहोरकडे वळवावे लागले. वाराणशी येथील फ्लाइट कंट्रोलला रेडिओ ट्रान्समीटरवरून विमान अपहरणाची कल्पना देण्यात आली. चीफने फ्लाइट पर्सर शर्माच्या पाठीशी पिस्तूल रोवल्यापासून अवघ्या सात मिनिटात हा सर्व प्रकार बाहेरच्या जगापर्यंत पोचला. ''हायजॅकर्सकडे बॉंब, डायनामाईट स्फोटके आणि एकशे सत्तेचाळीस एके बंदुका आहेत. लाहोरकडे चाललो आहोत.'' हेही कॅप्टन शरणने कळवले.

त्याच वेळी तेथून ४० अवकाश मैलांवर २८००० फूटांवरून पंतप्रधान वाजपेयी यांचे विमान दिल्लीकडे चालले होते. ते बिहारमध्ये एका मेळाव्यात भाषण करून परत दिल्लीला निघाले होते. पण त्यांनाही या अपहरणाची कल्पना नव्हती.

पुढे आठ दिवस या अपहरणनाट्याने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले.

दिल्लीतील ॲसोसिएटेड प्रेसचे प्रतिनिधी नीलेश मिश्रा (वय २७) यांनी या अपहरणनाट्याचा योजनाबध्द घटनाक्रम अभ्यासून हे पुस्तक सिद्ध केले आहे. त्याचा मराठी अनुवाद लीना सोहोनी यांनी केला आहे.


**पृष्ठे** **किंमत** : १२०रु. **सवलतीत** : १०२रु. **सभासदांना** : ९०रु. **पोस्टेज** :२०रु.

आय. सी. ८१४ विमानातील एका तरुण स्त्रीने आपल्या जीवनाची आशाच सोडून दिली होती. अशा वेळी आपल्या चार वर्षाच्या मुलीला पत्र लिहायचे तिने ठरवले. काठमांडूच्या हॉटेलात तिला मिळालेल्या ग्रिटिंगकार्डच्या पाठीमागे तिने आपल्या मुलीसाठी लिहिले,

**''बाळा, मी काही जगातली सर्वात चांगली आई होऊ शकले नसेन, पण प्लीज एक गोष्ट समजून घे. मी तुझ्यावर अगदी जीवापाड प्रेम केलं. तू धीर धर आणि देव तुझा नक्की सांभाळ करील. आत्ता हे पत्र वाचण्याएवढी तू मोठी नाहीस. पण एक दिवस तुला हे नक्की वाचता येईल.''**

# गुंता सोडविताना

## पन्नास स्त्रियांच्या समस्याग्रस्त जीवनकहाण्या




**लेखिका - अनुराधा गुरव**

सध्या घराघरात पतिपत्नीमधील विसंवादाची प्रकरणे वाढत चाललेली आहेत; त्यामुळे घटस्फोट, मुलांचे हाल, छळ-जुलूम, अत्याचार, हिंसाचार याचे वेगवेगळे प्रकार वृत्तपत्रांतून वाचायला मिळतात. न्यायालयातही त्याबद्दल बरेच खटले चाललले असतात. कौटुंबिक न्यायालयांच्या मार्फतही अशा प्रकरणांची हाताळणी होऊन, शक्यतो परस्परांचा समेट घडवून आणला जातो.

कोल्हापूरच्या प्रा.सौ. अनुराधा गुरव या आपले अध्यापन कार्य सांभाळून गेली काही वर्षे महिला आधार केंद्र– मोफत कायदा सल्ला व मार्गदर्शन, समिती, सामाजिक सुरक्षा समिती, महिला व बालकल्याण खाते यांच्या कार्यात सक्रिय सहभाग घेत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या महिला मंडळाच्या कायदा सल्ला केंद्राच्या स्थापनेतही त्यांचा पुढाकार होता. या समित्यांचे काम पाहत असताना अनेक कौटुंबिक कलहाची प्रकरणे त्यांच्यापुढे आली; आणि त्यामध्ये समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला. या प्रकरणांपैकी पन्नास यशस्वारीत्या सुटलेल्या कौटुंबिक दाव्यांच्या हकिकती सांगणारी लेखमाला त्यांनी पुढारीमध्ये लिहिली. तीच आता 'गुंता सोडविताना' या नावाने पुस्तकरूपात मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पुस्तकातील 'मनोगत' हे महत्त्वाचे असून त्यात कुटुंबसंस्थेची परंपरा व महती, कौटुंबिक जबाबदाऱ्या, कुटुंबात जाणवणारे ताणतणाव, त्याची कारणे, आणि त्यातून मार्ग काढताना आलेले अनुभव यावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.

लैंगिक संबंधावर आधारित आणि प्रजोत्पादन व बालसंगोपन करणारा मर्यादित गट म्हणजे कुटुंब ही मॅकआयव्हर या समाजशास्त्रज्ञाने केलेली व्याख्या त्यांना स्वीकारावीशी वाटते.

कुटुंबसंस्था ही सर्वव्यापक, सार्वत्रिक व सार्वभौम आहे. तिला भावनात्मक व सामाजिक अधिष्ठान आहे. या संस्थेची काही वैशिष्ट्ये सर्वांनाच जाणवतात. उदाहरणार्थ,

(१) समाजरचनेतील मूलभूत, मध्यवर्ती घटक



(२) सदस्यांवर संस्कार घडविण्याची क्षमता

(३) सदस्यांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याची क्षमता

(४) सहकार्य, त्याग या भावना जोपासण्याची क्षमता.

कुटुंबातील बेबनावाला आर्थिक कारणे वेगवेगळ्या प्रकारे मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरतात. इस्टेट, व्यवसाय उद्योग, जमीन, रोकड यांच्या विभागणीवरून भाऊभाऊ, भाऊबहिणी, बापलेक, आई-मुलगा, नातलग यांच्यात संघर्ष विकोपाला जातात. एकमेकांकडे शत्रुत्वाच्या भावनेने बघितले जाते. कधीकधी हत्याही होतात. त्याचप्रमाणे घटस्फोटानंतर पोटगीसाठी होणारे मतभेद, मालक-भाडेकरू, मालक व नोकर, कर्जदार व सावकार, मालक व कूळ, शेजाऱ्याचे घर व शेतीची हद्द, वहिवाटीचे हक्क यांच्यातही संघर्षाचे वातावरण निर्माण होते.

पतिपत्नीसंबंधात लैंगिक असमायोजनामुळे फारकतीपर्यंत संबंध ताणले जातात. विवाहाच्या अनुषंगाने हुंडा, शारीरिक छळ, वांझोटेपण, व्यसनीपणा, बलात्कार-विनयभंग, रागीट व चमत्कारिक स्वभाव, बेजबाबदार वर्तन, स्थिर नोकरी व आर्थिक उत्पन्न नसल्याने होणारे हाल, पतीचा संशयीपणा, नातलगांची फूस, यामुळे असमायोजन होते. सासरी गेल्यावर अनेक स्त्रियांना नातलगांकडून वाईट वागणूक मिळते; मानसिक-शारीरिक छळ होतो, आर्थिक अडवणूक केली जाते. त्यामुळेही पती आणि पत्नी यांच्या नात्यात दुरावा येतो. उणीदुणी काढणे वा टोचून बोलणे यातून अनेकदा मानसिक संतुलन ढळते. यासारख्या अनेक कारणांमुळे पतिपत्नी, कुटुंब यातील संघर्ष टोकाला जातो. सध्या या समस्या केवळ घरापुरत्या सीमित न राहता, त्या सामाजिक दृष्ट्याही अर्थपूर्ण व जाचक ठरत आहेत; त्यातूनही कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे कौटुंबिक न्यायालये व इतर समित्या यांच्या साहाय्याने ते सोडवण्यावर भर देण्यात येतो. हुंडाबळीसारखी घटना ही केवळ एका घरापुरती सीमित राहत नाही. शेकडो स्त्रियांचे हुंडाबळी जाऊ लागले की ती सामाजिक समस्या बनते. नवऱ्याचे अतिरिक्त मद्यपान हे केवळ एक कुटुंब बरबाद करून थांबत नाही; अनेक संसार उद्ध्वस्त करते.

'मनोगता'द्वारे अशी काही भूमिका अनुराधा गुरव यांनी मांडली आहे. ती काहीशी व्यावहारिक स्वरूपाची आहे. समोर आलेल्या समस्यांवर आधारित आहे. समाजशास्त्रीय वा न्यायालयीन परिभाषेत ती मांडलेली नाही.

या पुस्तकात पन्नास केस स्टडीज आल्या आहेत. त्या महत्त्वाच्या आहेत. त्या एकेका केस स्टडीमध्ये एकेका कादंबरीचा वा कथेचा ऐवज आहे. सदरलेखनाच्या मर्यादेमुळे अनुराधाबाईंनी मोजक्या शब्दामध्ये समस्येच्या गाभ्याला हात घातला आहे. या समस्या काही वेळा साध्या अहंकाराच्या, घराण्याच्या इभ्रतीच्या, संशयाच्या, चारित्र्यहीनतेच्या, इस्टेटीच्या वाटणीच्या आहेत. काही वेळा अन्य गुंतागुंतीच्या आहेत.

त्यात काही वेळा कोणातरी एक पक्षाकडे दोष असतो. कधीकधी दोघांचाही दोष असतो. कधी परिस्थितीचा.

लग्नानंतर पतीशी संबंध न येताही पत्नीला दिवस जातात. मूलही होते. पण पती तिला जवळ करीत नाही. पत्नी नवऱ्यावर दावा लावते. कारण न सांगता बायकोला टाकले

म्हणून... नवरा सांगतो, हे मूल माझे नाही. वाटले तर मुलाचे व माझे रक्त तपासून घ्या. विश्वासघात करणारी पत्नी मला नको. (फिर्यादीच गुन्हेगार ठरतो.)

सतरा-अठरा वर्षाची सुशिक्षित कमल. नवरा सासू सासरे दीर सर्व देव माणसे. पण तिचा बाप तिला काडीमोड घ्यायला सांगतो आणि एका बिजवराच्या गळ्यात तिला पाच-सात हजार रुपये घेऊन बांधण्याचे ठरवतो. कमल न्यायालयाला सांगते, ''कपाळीचं कुंकू पुसून मला शेण लावायचं नाही. माझे बाबा लबाड आहेत.'' (मला कुंकू पुसून शेन लावाचं नाही.)

जटा आल्या म्हणून शांता नवऱ्याला दुसरे लग्न करायला सांगते. सवतीच्या मुलाला जीव लावते. पण पुढे या घरात तिची उपेक्षा सुरू होते म्हणून ती वेगळे राहण्याचे ठरवते. कायदा सल्ला समितीकडे फिर्याद नेते. ''मला रानातलं घर अन महिना पाचशे रुपये पोटगी पाहिजे'' अशी मागणी करते. (वाटीतलं ताटात.)

उषा नोकरी सोडत नाही म्हणून नवरा संजय तिच्यावर चारित्र्यहीनतेचा आरोप करून घटस्फोटाची मागणी करतो. खरे तर नवरा आपल्या वडील भावाच्या मुठीत असतो आणि त्या वडीलभावाने उषाला न्हाणीत मिठी मारायचा प्रयत्न केलेला असतो. उषाने नोकरी सोडली तर तिचे भवितव्य अंधारमय होईल, हे लक्षात घेऊन दादाच्या मायावीपणाला ठोकरून, उषाच्या चारित्र्याचे खोटे कारण दूर करून संजयने तिच्याशी नांदावे असा सल्ला समितीचे सदस्य देतात. (भाऊ? न हा वैरी!)

सुलक्षणा एका गॅरेजवाल्या विवाहित पुरुषाच्या नादी लागते म्हणून तिची आजी तिला सारखे तोंडाला काळे फासले असे सांगून सतावत राहते. सुलक्षणाला आपली चूक कळते. ती समंजसपणे नोकरी करून बीए पूर्ण करायचे ठरवते. सल्ला समितीचे सदस्य आजीची समजून काढतात. (दुधावरली साय)

वंदनासारखी आकर्षक हसतमुख बायको मिळाली म्हणून श्रीकांत जमिनीच्या वरून चार बोटे तरंगत चालू लागतो. पण वंदना त्याच्या नोकरीच्या गावी रमत नाही. श्रीकांतला थंड प्रतिसाद देई. श्रीकांतजी झोप उडे. नंतर वंदना त्याला सांगते की तिच्या बहिणीचा नवरा उत्तम याच्याशी लग्नापूर्वी तिचे संबंध होते. वंदनाला अहंकार होता की आपल्या बहिणीच्या नवऱ्याला आपण गटवले... श्रीकांतशी लग्न झाल्यावरही उत्तम तिच्यावर बळजबरी करीत राहतो. श्रीकांत-वंदनाला मुलगी होते. तरीही उत्तम तिला सतावत राहतो. ती माहेरी जाण्याचे टाळते. घटस्फोटालाही नाही म्हणते. श्रीकांतला ती म्हणते, ''तुम्हा दुसरे लग्न करा पण मला माहेरी पाठवू नका. मी तुमच्या दारात कुत्र्यासारखी पडून राहीन. कसलाही हक्क सांगणार नाही.'' तिला उत्तमचे भय वाटते... या समस्येतून श्रीकांतला मार्ग काढणे अवघड ठरते. वाट पाहणे एवढेच त्याच्या हाती राहते. (पाप कोणाचे! शाप कोणाला?)

मामी आपली अल्पशिक्षित आणि खुळी बहीण मेडिकलला असणाऱ्या भाच्याच्या गळ्यात मारते. बायको हट्टी, डोक्याने कमी. बायको म्हणून जवळही येऊ देत नसे... माहेरी गेली ती परत आलीच नाही. भाचा जातीच्या चालीरीतीनुसार काडीमोड घेऊन दुसरे लग्न करतो. दोन मुले होतात. दहा वर्षांनी सासरा नोटीस पाठवतो. ''कायदेशीर घटस्फोट झालेला



नाही. मुलीची नांदायची तयारी आहे.'' (सासऱ्याची पिडा, नरड्याला तिढा.)

महालक्ष्मीला नवस फेडायला गरोदर वैजयंता रेखा (५ वर्षे), हेमा (३ वर्षे) यांच्यासह नवऱ्याबरोबर येते. नवरा पुरुषांच्या रांगेत उभा राहतो. दर्शन झाल्यावर पारावर बसायला सांगतो. संध्याकाळ होते. नवरा परत येतच नाही... वैजयंता घरी येते. धुणी भांडी करून पोट भरते. परागंदा पतीचा शोध करावा असे कायदा केंद्रात येऊन सांगते. (नगरी नगरी द्वारे द्वारे)

...अशा नाना तऱ्हेच्या समस्या या पुस्तकात वाचायला मिळतात. त्यांचा गुंता सोडवणे नेहमीच जमते असे नाही. कथेच्या अंगाने निवेदनावर भर असल्याने यातील समस्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण फारसे केले गेलेले नाही. त्यामुळे बहुतेक वेळा वैयक्तिक पातळीवरच समस्या घोटाळत राहतात.

**पृष्ठे** १६८ **किंमत** :११०रु. **सवलतीत** : ९४रु. **सभासदांना** : ८३रु. **पोस्टेज** :१५रु.



## *वेगवेगळी मार्गदर्शक पुस्तके*




### तुम्ही आणि तुमचे वैवाहिक जीवन

वैवाहिक जीवनाची वाटचाल यशस्वीपणे होण्यासाठी
काही मूलभूत गोष्टींबाबतचं उपयुक्त मार्गदर्शन.
मूळ लेखक : पार्किन्सन/रुस्तुमजी/व्हिएरा
अनुवाद : डॉ. प्रमोद संभूस
किंमत : ७०रु. सवलतीत : ६०रु. सभासदांना : ५६रु.
पोस्टेज : १५रु.

### सुखद मातृत्व

'आई' होताना आईपणाचा मानसिक,
शारीरिक दृष्टिकोनातून विचार कसा करावा,
याबाबत मार्गदर्शन करणारं संग्राह्य पुस्तक.
लेखिका : डॉ. रत्नावली दातार
किंमत : ५०रु. सवलतीत : ४३रु.
सभासदांना : ३८रु. पोस्टेज : १५रु.








### आपले सौंदर्य आणि त्याची निगा

आजच्या आधुनिक स्त्रीच्या सौंदर्याबाबतच्या प्रकट- अप्रकट
सर्व समस्यांचे निराकरण करणारे
सोप्या सुबोध भाषेतील उत्कृष्ट मार्गदर्शन.
मूळ लेखिका : ब्लॉसम कोच्चर
अनुवाद : मीना टाकळकर
किंमत : १००रु. सवलतीत : ८५रु.
सभासदांना : ७५रु. पोस्टेज : १५रु.

# उत्तम स्मृतीचा कानमंत्र




## स्मरणशक्तीची देणगी प्रत्येक व्यक्तीला आहेच, मग तुम्ही मागे का पडता?

**मूळ लेखक- अनंत पै अनु. -चारुलता पाटील**

एखादा वक्ता भाषणात थोरामोठ्यांची समर्पक अवतरणे देतो, एखादा मुलगा लाबंलचक कविता न अडखळता म्हणतो, एखादा वकील कोर्टात जुन्या केसेसचे संदर्भ भराभर देतो, तेव्हा आपण त्यांच्या स्मरणशक्तीची तारीफ करतो माणसाची हुशारी मोजायचे एक साधन म्हणजे त्याची स्मरणशक्ती. पूर्वी जेव्हा कागद अस्तित्वात नव्हता, छपाईची कला अवगत नव्हती. तेव्हा केवळ स्मृतीवरच अवलंबून राहावे लागे. भारतातील वेद-उपनिषदे-ब्राह्मणे-आरण्यके वगैरे ग्रंथ पिढ्यानुपिढ्या कानामात्रेचा फरकही न होता टिकून राहिले याचे कारण त्यांचे पाठांतर विशिष्ट पद्धतीने करण्याचे तंत्र विकसित करून त्यानुसार अनेक घराण्यांनी त्यांचे जतन व्रतस्थ वृत्तीने केले. माणसाने जे जे ज्ञान मिळवले ते स्मृतीच्या रूपात पुढच्या पिढ्यांनी जपले. त्यात भर घातली.

स्मृती म्हणजे अनुभव ग्रहण करून ते दीर्घ वा अल्प कालावधीसाठी जतन करण्याची प्रक्रिया. सोप्या भाषेत सांगायचे तर व्यक्तीचे चेहरे, आकडे, तारखा, प्रसंग वा घटना, वाचलेला मजकूर वा कानावर पडलेल्या गोष्टी इ. लक्षात ठेवण्याची माणसाची क्षमता म्हणजे स्मृती.

काही माणसांना क्रिकेटच्या कुठल्या सामन्यात कोणी किती धावा काढल्या हे झटपट सांगता येते, काहींना इतिहासाच्या सनावळी व घटना अचूक सांगता येतात. काही व्यक्ती शतावधानी वा सहस्रावधानी असतात. त्या शंभर वा हजार गोष्टी त्याच क्रमाने पुन्हा सांगू शकतात, तर काही व्यक्तींना कवितेच्या चार ओळी धड म्हणता येत नाहीत, परिचयातल्या माणसांची नावे आठवत नाहीत किंवा गणितातले पाढे म्हणता येत नाहीत. याचा अर्थ काही माणसांची काही विशिष्ट बाबतीत स्मरणशक्ती भरपूर असते; परंतु अन्य बाबतीत कमी असते.

खरे तर प्रत्येक व्यक्तीला स्मरणशक्ती असते; आणि ती भरपूर प्रमाणात असते. कोणाला कमी वा कोणाला जास्त, कोणाची वाईट तर कोणाची चांगली– असे शब्दही स्मरणशक्ती बाबत वापरण्याची पद्धत असली तरी त्याला स्मरणशक्तीपेक्षा योग्य प्रशिक्षणाचा अभाव असेच म्हणावे लागते.



'अमरचित्रकथा' या भारतीय भाषांतील चित्रकथा मालिकेचे प्रवर्तक अनंत पै यांच्या मते वाईट किंवा कमकुवत स्मृती अशी काही गोष्ट अस्तित्वात नसते. प्रत्येकाला यथायोग्य स्मरणशक्ती असते. हे गृहीत धरून उत्तम स्मृतीचा कानमंत्र हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. ते मुलांसाठीच आहे असे मानणे चुकीचे ठरेल. कोणत्याही वयातील व्यक्तीला ते उपयुक्त ठरेल.

स्मरणशक्ती वाढविण्याचे अनेक ठोकताळे या पुस्तकात देण्यात आले आहेत. त्यामुळे सर्वांनाच त्यांचा फायदा होऊ शकेल. अनंत पै हे उदाहरण देऊन, किस्से सांगून नंतर त्यावरून निघणारा निष्कर्ष सांगतात. त्यामुळे विवेचन तर्कबुद्धीला सहज पटते.

स्मृती ही गोष्ट शरीरशास्त्रानुसार एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. तुमची स्मृती ही तुमच्या एकाग्रतेवर अवलंबून असते आणि एकाग्रता ही तुम्हाला ज्या गोष्टीबाबत रस असतो त्या बाबतच साधणे शक्य होते.

अर्थपूर्ण माहिती स्मरणात ठेवणे सोपे जाते. योग्य संदर्भामुळेही (आकृती, वर्गीकरण, काळ, स्मरणसाखळी, रंग, रूप, गंध वास इ.) गोष्टी लक्षात राहू शकतात. परदेशात स्मरणशक्तीविषयक संशोधन दीर्घकाळ चालू आहे.

स्मरणशक्तीची दोन अंगे आहेत. प्रक्रियानिष्ठ स्मृती व वस्तुनिष्ठ स्मृती. सायकल चालवणे, इस्त्री करणं, बुटाची लेस बांधणे इ. प्रक्रियानिष्ठ स्मृतीने जमणाऱ्या गोष्टी असून माहिती व ज्ञान ग्रहण करण्याचे काम वस्तुनिष्ठ स्मृती करते.

स्मृतीला शरीरशास्त्रीय बैठक असते; तसेच स्मृती हा मनोव्यापाराचाही भाग असतो. मेंदूतील हिप्पोकॅम्पस हा भाग काढून टाकला तर वास्तवनिष्ठ स्मृती पूर्णपणे नाहीशी होते असे आढळून आले आहे. मात्र तरीही प्रक्रियानिष्ठ स्मृतीचे कार्य चालू राहते.

स्मरण प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणजे पाच ज्ञानेंद्रियांद्वारे होणारे पर्यावरणाचे ज्ञान. रंग, रूप, वास, चव, गंध यांच्याशी निगडित आपल्या स्मृती असतात.

मेंदूची बहुतांशी वाढ ही बालक आईच्या गर्भात असताना आणि जन्मानंतरच्या पहिल्या तीन वर्षातच होते. सातव्या वर्षी मुलाचा मेंदू पूर्ण वजनाचा होतो. मेंदूची गुणवत्ता अनुवंशिकतेवर व जन्मानंतरच्या आहारावर अवलंबून असते. मज्जापेशींची मूलभूत संख्या मूल सात वर्षाचा होईपर्यंत निश्चित होते; त्यात पुढे वाढ होत नाही.

संगणकात जशी माहिती भरावी लागते, तशीच मेंदूही माहिती ग्रहण करीत असतो. माहिती स्मृतिकोशात साठवणे, तिचे वर्गीकरण करणे, आणि योग्यवेळी ती आठवणे याबाबत माणसाची क्षमता कुठल्याही उत्तम संगणकापेक्षा कमी नसते.

स्मृती विषयक अनेक शास्त्रज्ञांनी प्रयोग करून काही ठोकताळे बसवले आहेत. उदा. माणसं आपल्या आवडणाऱ्या गोष्टीतून शिकतात. (जोहान वूल्फ गँग गॉथे); माणूस त्याला आवडणारी गोष्टच शिकू शकतो आणि आवडणाऱ्या व्यक्तीकडूनच ती शिकू शकतो. (जी आर लीफ्रँक्राइस्). आनंददायक गोष्टींशी सांगड घातली तर कुठलीही बाब स्मरणात राहणे सोपे जाते. संवेदन, अवधान, पुनर्रचना, प्रशिक्षण, समधातता किंवा मनाची समतोल वृत्ती आणि साहचर्य अशी स्मरणाची सहा सूत्रे अनंत पै वाचकांपुढे ठेवतात.

स्मृती-सुधार पद्धती प्रथमतः शोधून काढण्याचे श्रेय ग्रीक कवी सिमोनाइडस (इ. स. पूर्व ४७०) याजकडे जाते.

साहचर्यात्मक स्मृतीचेही अनेक घटक आढळतात. नियोजन, ध्वनी, साम्य, विरोध, वर्गीकरण, प्रतिमा रेखाटन, विशेष गुणधर्म, एकत्रपणा, कार्यकारण संबंध, दीर्घश्वसन, ध्यानधारणा यामुळेही स्मृती तल्लख होऊ शकते.

एखाद्या व्यक्तीशी तुमची नव्याने ओळख होते. तेव्हा त्या व्यक्तीचे निरीक्षण करून तिच्याविषयीची प्रतिमा ठसठशीतपणे मनावर बिंबेल असे पाहा. या निरीक्षणासाठी पुढील काही मुद्दे उपयुक्त ठरतील.

१. त्या व्यक्तीची केशरचना. केस कसे आहेत? कुरळे, सरळ, जाड, पातळ, काळे, पांढरे?

२. कपाळ कसे आहे? रुंद, अरुंद, केसांची रेषा मागे सरकलीय का?

३. त्याच्या डोळ्यांवर चष्मा आहे का? डोळे कसे आहेत? काळे, निळे, घारे/

४. भुवया कशा आहेत? जाड, विरळ, लांब, लहान? पुंजक्याप्रमाणे?

५. पापण्या कशा आहेत?

६. नाक कसे आहे? बसके, सरळ, लांब, गरुडाच्या चोचीसारखे?

७. गालाची हाडे कशी आहेत? उंच, मध्यम, सपाट?

८. कान कसे आहेत? सपाट, उभारलेले, लांबट, गोल, टोचलेले?

९. ओठ कसे आहेत? जाड, पातळ, खालचा ओठ वरच्यापेक्षा रुंद/अरुंद?

१०. हनुवटी कशी आहे? गोल, चौकोनी मधोमध खळगी?

त्या व्यक्तीचे नाव, आडनाव वगैरेही जाणून घ्या. त्याची भाषा, व्यवसाय इ. इ. स्मृतीबाबत आणखीही काही गोष्टी लक्षात घेण्याजोग्या आहेत.

आपल्याला त्रासदायक वाटणाऱ्या, अपयशाच्या, मानभंगाच्या स्मृती विसरणे;योग्य, अशा गोष्टींबाबत विस्मृती हेच वरदान म्हणायला हवे. त्यामुळे त्यांची धार बोथट होते.

करून पाहा, जुळवून घ्या, ताप कमी करा, विश्वास ठेवा, मदत करा आणि कौतुकानं दखल घ्या हा आनंदाचा, सुखाचा मंत्र लक्षात ठेवा.

आपल्या स्मरणशक्तीविषयी अशी बहुविध माहिती देऊन स्मृती-सुधाराविषयी काही ढोबळ ठोकताळे सांगणारे उत्तम स्मृतीचा कानमंत्र हे पुस्तक विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शक ठरू शकेल. आवड, सराव आणि आत्मविश्वास याद्वारे आपली स्मृती ही नेहमीच तल्लख राहून आपल्या व्यक्तिमत्त्वाला व प्रभावाला हातभार लावू शकेल. आपल्या अभ्यासाची, व्यासंगाची आणि संभाषणपटुत्वाची छाप इतरांवर पाडण्यासाठी स्मृतीचे सहकार्य नितान्त आवश्यक आहे आणि मनात आणले तर हवी ती गोष्ट लक्षात येते– अशी स्वत:शीच खूणगाठ बांधायला हवी.

**पृष्ठे** ८३ **किंमत** : ५०रु. **सवलतीत** : ४३रु. **सभासदांना** : ३८रु. **पोस्टेज** :१५रु.



# घरातील बाग




**आपल्या घरातही आपण रंगीबेरंगी बाग सजवू शकता.**

**लेखक- आ. बा. पाटील**

सुंदर माझी फुलबाग, सुंदर माझी फळबाग, बोन्सायां या लोकप्रिय पुस्तकाचे लेखक आ. बा. पाटील यांनी 'घरातील बाग' या नव्या पुस्तकात छोट्याशा फ्लॅटमध्ये विविध प्रकारची झाडे व कुंड्या ठेवून, आल्हादकारक वातावरण निर्माण करण्याचे तंत्र आणि मंत्र समजावून सांगितले आहे.

फ्लॅटमध्ये नैसर्गिक मिनी झाडाझुपांची सजावट करावी ही कल्पना त्या मानाने मध्यवर्गीय कुटुंबात अजून सार्वत्रिक मान्यता पावलेली नाही. परंतु आता वाढत्या सुबत्तेमुळे आणि दूरचित्रवाणीवर सतत दिसणाऱ्या उत्तमोत्तम सजवलेल्या घरांमुळे आपल्या फ्लॅटमध्येही आपण खूप काह करू शकतो अशी जाणीव प्रभावी ठरू लागली आहे. पूर्वीही घरात तुळस वगैरे ठेवण्याची प्रथा होतीच. झाडांच्या वाढीला सूर्यप्रकाश, हवा, सावली वगैरे लागते. त्यामुळे घरात निवडक झाडेच ठेवता येतात. ही झाडे प्रामुख्याने परदेशातील आहेत.

नव्यानेच घरात झाडे लावण्यास प्रारंभ करणाऱ्यांना कमी किमतीची व कमी त्रासात ठेवता येण्यासारखी झाडे कोणती, झाडांची उंची व आकारमान, त्यांच्या पानांचे आकार व रंग, सूर्यप्रकाशाच्या प्रमाणानुसार योग्य ती झाडे या प्रत्येक बाबींकडे लक्ष द्यावे लागते.

* कॅक्टस, फर्न, बिगोनिया, मॉन्स्टेला, रबर प्लँट, क्रोटान्स फिलॉडेन्ड्रान, सेन्सेव्हेरिया, रक्तपर्णी हे झाडांचे गट घरातील बागेसाठी सोयीस्कर ठरतात.

* हिरव्या रंगाची पाने असणारी झाडे - रबर प्लँट, ड्रेसिना, फर्न, मेडन हेअर फर्न, फिलॉडेन्ड्रॉन

* रंगीत पानांची झाडे – रंगीत ड्रेसिना, भरान्टा क्रोटॉन्स, सेन्सेव्हेरिया, ट्रॅडे स्कॅन्शिया

* उभट झाडे – शिडशिडीत खोड. रबर प्लँट, पामसारखी झाडे, ड्रेसिना.

* गवताळ शोभेची झाडे – क्लोरोफायटस

* झुडपासारखी झाडे – खोडाच्या बाजूला उपखोड फुटून झुडपासारखी दिसणारी झाडे– रेक्स बिगोनिया, मरांटा, पिलीयास, अर्कामिनीज.

* कंदमुळांची फुलणारी झाडे – ग्लोरिओसा, क्लिव्हिया मिनेटा, अमरिलीस, ईस्टर लिली, डॅफोडिल्स, गुलछडी, ट्युलिप, झेफिरँथस.

* चेंडूच्या आकाराची झाडे – कॅक्टस (पाने नसतात) कॅमलेरिया.

* वेली/लोंबकळणारी झाडे – मनी प्लँट, फिलॉड्रेडॉन.

* पानांचा गुच्छ असलेली बुटकी झाडे – ब्रोमेलियाड.

* अर्ध सावलीत वाढणारी झाडे – फर्न मॉस्टेरा रबर प्लँट, ड्रेसिना, पेपरोमिया, डिफनबोकिया.

* खिडकीपासून लांब सावलीच्या जागी टेवता येण्याजोगी झाडे – अस्पीड्रीस्ट्रा सेन्सेव्हेरिया.

* ऊन नसतानाही प्रकाशात वाढणारी झाडे– पिलिया बिगोनिया, डेफिन बोकिया ॲस्पॅरगॅस.

* सूर्यप्रकाश येणाऱ्या खिडकीसाठी झाडे-झेब्रिना, बोगनवेल, लाटांना कोलियस, आयरेसीन, नोरियम, सक्युलंटस कॅलिस्टेमॉन.

घरात झाडे वेगवेगळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या कारणांसाठी ठेवता येतात. पार्टिशन किंवा रूम डिव्हायडर म्हणून वेलीच्या कुंड्यांमधील वेल दोऱ्या बांधून वरपर्यंत नेता येतात. बैठकीच्या किंवा झोपण्याच्या खोलीत उंच टेबलावर टीपॉयवर ठेवलेले झाड शोभिवंत दिसते. नक्षीदार लोखंडी स्टँडवर अनेक झाडे ठेवता येतात.

भिंत मोठी असेल तर मोठ्या पानांची अनेक झाडे एकत्र असलेली कुंडी ठेवणे श्रेयस्कर.

लहान खोलीत नाजूक पानांची पाम किंवा फुलझाडे छान दिसतात. जमिनीवर, खिडकीत, टेबलावर, पुस्तकांच्या केसवर, ट्रॉलीवर, व्हरांड्यातील कठड्यांवर कुठेही झाडे ठेवता येतात.

खिडकीतील झाडांची रचना, टेबलावरील बाग, डिशगार्डन, काच हंडीतील झाडे, हँगिंग बास्केट (लोंबकळणाऱ्या टोपल्या) अशी विविधता घरातील बागेबाबत आजकाल दिसते. कुंडीतील झाडांना सर्व बाजूंनी वाढ होण्यासाठी नियमित छाटणी करावी लागते. खराब झालेली, रोगट व निस्तेज झालेली पाने काढून टाकावी लागतात.

नवीन झाडे घरातच तयार करण्यासाठी पानांचे कटिंग, विभाजन, रनर, गुटी कलम, दाब कलम, टिश्यू कल्चर इत्यादी मार्गांचा अवलंब करावा लागतो. बी लावून येणारी झाडेही असतातच.

* कलम-कॅक्टस, ॲकोर्तफा (गुटी), रबर प्लँट (गुटी), छाटे-क्रोटॉन ट्रोसिना आयव्ही, रबरप्लँट, मरांटा बेलोपेरॉन. बिया ॲन्थुरियम, आरोकेरिया, पाम्स ॲकॅलिका, बॉटलब्रश, विभाजन-आरोकेरिया, फर्न, आस्पार्डिटा, ॲडिअटम फर्न, रनर्स (धुमारे)– पाम्स, ब्रोमेलियाडम.

या झाडांची तपशीलवार माहितीही या पुस्तकात देण्यात आली आहे. ती वाचताना वनस्पती सृष्टीतल्या विविधतेने आश्चर्यचकित होण्याची पाळी येते.

* ॲस्पॅरगस फर्नची पाने पिसासारखी हलकी असतात. तारेसारख्या देठावर लहान फांद्या असतात.

* बर्ड नेस्ट फर्नची पाने हिरवीगार, चमकदार वर सरळ वाढणारी मोठी असतात.

* बोस्टन फर्नची पाने भरदार तलवारीसारखी असतता. काही तुऱ्यांसारखीही. बटन फर्नच्या फांद्या खालील बाजूस पसरतात. बटनासारखी पाने एका ओळीत फांदीच्या दोन्ही



बाजूला असतात. पानांच्या वजनाने फांद्या खाली वाकून कमानीसारख्या दिसतात.

* हेअर फूट फर्नच्या प्रत्येक कंदाला चंदेरी-निळी-हिरवी लांब पाने फुटतात. कडा नागमोडी.

* टेबल फर्नला कंदापासून लांब आकाराची हाताच्या पंजासारखी व बोटासारखी पाने फुटतात. ती नागमोडी आणि गुच्छाच असतात.

* बिशप्स कप हे कॅक्टस रुंद भागात विभागलेले असून, त्याचा प्रत्येक भाग काट्याऐवजी चंदेरी पिठाने झाकलेला असतो. शेंड्यापासून गडद पिवळी फुले येतात.

* एकिनोसेरेस कॅक्टसची उंची २० सेंटिमीटर, पण फुल झाडापेक्षाही मोठी असतात. गुलाबी वा जांभळ्या रंगाची. गोल्डन पिनकुशल कॅक्टसच्या गर्द हिरव्या कंदावर लहानलहान गाठी असून त्यातून पिवळसर नारंगी रंगाचे लांब काटे उगवतात.

* रॅबिटस इंअर कॅक्टस हे सशाच्या कानाप्रमाणे दिसते. पिवळसर काटेही असतात. कधीतरी पिवळी फुलेही येतात. ख्रिसमस कॅक्टसचे देठ, फांदी वाकतात आणि छत्रीसारखा आकार त्याला येतो. मॅग्नेटा रेड रंगाची फुलेही खाली झुकतात. ही फुले ख्रिसमसच्या वेळी येतात हे विशेष!

घरात आपण बाग फुलवू शकतो; घराला शोभिवंत बनवू शकतो. नाना आकारांची फुलांची ही रंगीबेरंगी झाडे आपल्या जीवनातही नवी बहार आणू शकतात. त्यासाठी घरातील बाग हे पुस्तक संग्रही हवेच.

**पृष्ठे** २५८ **किंमत** : १६०रु. **सवलतीत** : १३६रु. **सभासदांना** : १२०रु. **पोस्टेज** :२०रु.


## आ. बा. पाटील यांची इतर संग्राह्य पुस्तके




प्रत्येकाला आपली सुंदर बाग असावी असे वाटते. आपली बाग कशी फुलवावी, तिची कोणती काळजी घ्यावी, बागेत कोणती झाडे लावावीत,या बाबत शास्त्रोक्त मार्गदर्शन करणारी पुस्तके.




**सुंदर आपली फुलबाग ८०रु.** **सुंदर आपली फळबाग ८०रु.**


सभासदांना ६०रु. पोस्टेज प्रत्येकी १५रु. सभासदांना ६०रु.

बोन्साय म्हणजे झाडाचे मूळचे नैसर्गिक तेज अधिक जातिवंत व सौंदर्यपूर्ण बनवलेले संक्षिप्त रूप.




**बोन्साय ७५रु.**
सवलतीत ६४रु.
सभासदांना ५६रु.
पोस्टेज १५रु.

# हितगुज




## मायलेकींतील पत्रव्यवहारातून प्रकट होणारे अनोखे भावविश्व

**मूळ संपादन- कॅरन पेन अनुवाद- वृंदा दाभोलकर**

'बीटवीन अवरसेल्व्हज् ; लेटर्स बीटवीन मदर्स अँड डॉटर्स' या मायलेकींनी एकमेकांना लिहिलेल्या पत्रांचा संग्रह कॅरेन पेन हिने संपादित केलेला आहे, त्यात १७५० ते १९८२ या कालावधीतील अमेरिकेतील नामवंत कर्तृत्ववान तसेच सर्वसामान्य महिलांच्या पत्रव्यवहारातील वेचक पत्रांची काही विशिष्ट आशयाच्या अनुरोधाने वर्गवारी व निवड करण्यात आली आहे.

हे पुस्तक म्हणजे स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यासातील एक मोलाचा दगड आहे असे एमएस नियकालिकाने म्हटले; तर ''आईच्या व मुलीच्या आत्म्याला हृदयस्पर्शी ऊब देणाऱ्या शब्दांनी संपन्न असे हे पुस्तक स्त्रियांच्या अंतरंगातील भावनांना बोलके करणारे'' आहे असे बॉस्टन हेरॉल्डने म्हटले.

''कमालीच्या भिन्नभिन्न, प्रक्षुब्ध उलटसुलट, अनावर व उघड कबुली देणाऱ्या भावनांनी भरगच्च'' अशी ही पत्रे आपल्या विचार प्रवर्तनाला घालता येतात असे वॉशिंग्टन पोस्टने म्हटले.

''बौद्धिक व भावनिक संसाधनाला म्हणजेच युक्त्या, प्रयुक्त्या, क्लृप्त्या, हिकमती इ. साऱ्या ऊर्जास्त्रोताच्या नाट्यपूर्ण, पत्ररूप आविष्कारातून लाघव, आर्जव, आर्तता, परखडपणा, आत्मपरीक्षण, अभय, आश्वासकता, प्रक्षोभ, तगमग, आतुरता, घुमसट, आत्मग्लानी, आत्मसंभ्रम इत्यादी भावनांचा अनावर आवेग प्रकट होतो. ही पत्रे पाश्चिमात्य देशातील मायलेकींमधील आहेत; त्यामुळे त्यात पाश्चिमात्य संस्कृतीतील संघर्षाचा कोलाज दिसतो. परंतु आजच्या आधुनिक भारतीय सुशिक्षित मध्यमवर्गीय कुटुंबातही अशाच प्रकारचे सामाजिक व पारिवारिक ताणतणाव दिसू लागले आहेत. या भावनेने वृन्दा दाभोलकर यांनी या पुस्तकातील मूळ ऐंशी मायलेकींपैकी फक्त ४० मायलेकींमधील पत्रांचे मराठीकरण करून 'हितगुज' या नावाने वाचकांपुढे ठेवले आहे. या पत्रांमद्ये हवापाण्याची चर्चा नाहीय तर अगदी अटीतटीच्या प्रश्नांची, लहानमोठ्या संघर्षाची, बऱ्यावाईट निर्णयांमुळे निर्माण झालेल्या ताणतणावांची आणि नात्यानात्यांमधील चढत्या-उतरत्या आलेखांची देवाण-घेवाण दिसते. सामान्य स्त्रियांमधील असामान्यत्व टिपणारे हे लहान-मोटे व्यक्तिगत लढे-व्यापक स्त्रीवादी भूमिकेचा पाया दृढ करतात आणि आपली एकूणच अस्तित्वविषयक जाणीव अधिक समृद्ध



व व्यापक करतात. स्त्रीत्व, मातृत्व स्वत्व यांची एकीकडे रस्सीखेच असते तर स्वतंत्रपणा, स्वायत्तता व विलगता-तुटलेपणा यांचीही त्यात कसोटी लागते.

या पुस्तकातील पत्रांची निवड काही विशिष्ट आशयकेंद्रे समोर ठेवून केली गेली आहे, आई, मुलगी, पिता, भाऊ वगैरे पारंपारिक नात्यांबद्दलचा रूढ कल्पनांना धक्का देणारेही अनुभव त्यात येतात.

१. घराघरातील लाडक्या परीसदृश अशा नाजूक निरागस मुलींचे लडिवाळ संगोपन आणि नंतर याच मुलींना व्यवहारी जगाचे चटके बसून येणारे विपरीत अनुभव, सावत्र बाप, भावंडे इ. चे अनुभव.

२. तारुण्यात पदार्पण केल्यावर आयुष्यात येणारे पुरुष-प्रियकर, जोडीदार, त्यांचे वर्तन व स्वभावप्रवृत्ती, प्रेमाबद्दल घरी खुलेपणाने बोलता न येणे; त्यामुळे चालणारी लपवाछपवी. कसरत.

३. घराचा उंबरठा ओलांडताना उद्भवणारे पेचप्रसंग. लग्नानंतर नवऱ्याशी न पटल्याने त्याच्यापासून अलग होताना येणाऱ्या अडचणी, त्याबाबात आईचे व घरच्यांचे मिळणारे मार्गदर्शन व सहकार्य.

४. अपत्यप्राप्तीचा आनंद, मुले दूर जातात तेव्हा वाटणारे दुःख.

५. स्त्रियांनी एकमेकींवर प्रेम करणे, लेस्बियन संबंधांबद्दल मायलेकीमध्ये होणारी चर्चा, लेस्बियनचे प्रकार, पुरुषांचा तिटकारा

६. घटस्फोटामुळे स्त्रीला वाटणारी मुक्ततेची भावना, सुटकेचा आनंद, मुलगी म्हणून भोगलेल्या वेदनेचे प्रकटीकरण, पुस्तकी उत्तरे वैयक्तिक वेदना शमवत नाहीत. आपल्य आईशी व अन्य लोकांशी असलेला चालू संबंधात त्यामुळे येणारे ताण मुलींवर किंवा आयांवर ठपका ठेवण्याची प्रवृत्ती

या पत्रांचे लेखन करणाऱ्यांमध्ये अनेत नामवंत लेखिका आहेत. तसेच विशेष प्रसिद्धी नसलेल्याही काही स्त्रिया आहेत. अमेरिकन-ब्रिटिश कवयित्री सिल्व्हिया प्लाथ, फ्रेंच लेखिका जॉर्ज सँड, लिटल वुमनची लेखिका लुईसा मे अॅल्कॉट, पुलिट्झर प्राईझची मानकरी कवयित्री अॅन सेक्स्टन, समाजशास्त्रज्ञ जेसी बर्नार्ड, स्वीडिश लेखिका फ्रेडरिका, ब्रेमर, डिपोलिटिकल इकॉनॉमीची लेखिका हॅरिअट मार्टिना, आधुनिक वैद्यकशास्त्राची पदवी घेणारी पहिली महिला एलिझाबेथ ब्लॅकवेल, स्त्रीवादी लेखिका ऑलिव्ह श्रायनर, 'द वुमन हू लॉस्ट हर नेम्स' या अमेरिकन ज्यू महिलांच्या लेखांची संपादिका एलेन मार्कस स्टार्कमन, कवयित्री जॅकी लॅपिडस, डॅनिश लेखिका आयझक डिनसेन (कॅरन ब्लिक्झे) इ. महिलांची पत्रे यात आहेत.

एका भारतीय महिलचीही पत्रे आहेत. तिचे नाव मीरा. वयाच्या विसाव्या वर्षी ती अमेरिकेतल्या कॅलिफोर्निया विद्यापीठात समाजशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी गेली (१९६०) विद्यापीठातील एका अमेरिकन तरुणाशी लग्न केले. तिच्या मुलीचे नाव रिटा. मीराची आई, मीरा व रिटा या तिघांचीही पत्रे यात समाविष्ट केली आहेत.

मीराच्या पत्रातून तिची द्विधा व गोंधळलेली मन:स्थिती दिसते. तिला लिहावेसे वाटत

होते की, मी येथे अमेरिकन वा जो कोणी असेल त्याच्या प्रेमात पडेन तर मला जे वाटेल तेच करीन. इतक्या दूर अंतरावरून तू माझ्या जीवनावर हुकमत गाजवू शकशील असं तुला वाटत असेल तर तो भ्रम आहे. कुटुंबाच्या नावाला काळिमा न फासणारी तुमची चांगली मुलगी असण्यातच मला अतीव समाधान आहे...'' पण ती एवढेच लिहिते की 'मला आपल्या चालीरीतीविषयी जास्त विचित्र वाटू लागलंय समज, मी एखाद्या अमेरिकनाशी लग्न केलं तर काय जगाचा अंत होणार आहे का?' वर्षाने ती सरळ लिहिते, ''जॉन कोहन मला सहा महिन्यांपूर्वी भेटला. त्याच्याशी लग्न करण्यासाठी तुमची परवानगी हवीय म्हणून हे पत्र लिहित आहे...

आई कळवते, ''तू आमच्याशी असं कसं वागू शकतेस? तू लगेच भारतात परत ये. लग्न म्हणजे जे तुझ्या मनात आहे ते असेल तर तिथे अमेरिकेत राहण्यात काहीच अर्थ नाही. आम्ही तुझं इथं पटकन लग्न करून टाकू. पैसे पाठवत आहे. विमानाने ये.''

त्यावर मीराचे उत्तर : ''गेल्या आठवड्यात मी व जॉननं लग्न केलं. तुम्ही पाठवलेले पैसे छोट्याशा स्वागत समारंभासाठी वापरले. तुमचे पैसे म्हणजे तुमचा आशीर्वादच मानते.'' पण ती हे पत्र न पाठवता ती लिहिते. ''मी तुमच्या पिढीतील नाही ही गोष्ट लक्षात घ्या. मी आता मोठी झाले आहे. एक प्रयोग म्हणून ह्या सगळ्यातून मला जाऊ द्या. सुखी असण्यासाठी अधिक मुक्त बनू शकले तर बरे वाटेल. कृपया माझा अंतर्गत संघर्ष समजावून घ्या व माझ्याबरोबर राहा.''

या मीराला तिची वीस वर्षाची मुलगी १९८१ मध्ये लिहिते, ''तू माझ्या वयाची असताना अमेरिकेत आलीस. अमेरिकन जीवनशैली वाखाणलीस, शक्य तेवढं अमेरिकन बनण्याचा प्रयत्न केलास. तू मला जन्म दिलास. तू भारतीय व माझे वडील अमेरिकन आहेत. अर्थातच मी अमेरिकन आहे... पण मी भारतीय बनावं असं तुला वाटतंय. पण मी त्या जीवनशैलीकडे माघारी येऊ शकणार नाही. मला माझ्या इच्छेप्रमाणे माझ्या सभोवताली वेढलेले जीवन जगू दे. माझ्या इच्छेप्रमाणे मला ते नाकारू दे. भोगू दे... तू माझ्यावर टीका करतेस. तेव्हा आपण दोघी भिन्न भिन्न जगांमध्ये जन्मलो व त्यामुळे आपल्यात मोठा फरक आहे हे तू विचारात का घेत नाहीत? आपल्यात अंतर पडलेले आहे– त्याचे कारण भारत हे आहे. आपण अद्यापही मैत्रिणी बनू शकतो. तू व तुझी आई यांना ते जमले नाही, पण आपण प्रयत्न करू या.'' (२६२-६३).

असा हा मायलेकीतला ताणतणाव अनेक पातळ्यांवर प्रकट होतो.

या पुस्तकात अशा अनेक मायलेकींमधील भावनात्मक व वैचारिक देवाण-घेवाण झालेली आहे. एकेक नाते म्हणजे एक स्वतंत्र भावविश्वच आहे. त्यात एखादे पत्र वाचकांना भयानक धक्का देणारेही आहे.

टेरी नावाची एक मुलगी आपल्या आईला लिहिते, ''माझ्या पंचविसाव्या वाढदिवसाच्या (१९८०) सायंकाळी आयुष्यातला खोटारडेपणा थांबवण्याचे मी ठरवते आहे. मी लहान असताना माझ्या सावत्र बापाने, तुझ्या नवऱ्याने माझ्याशी असभ्य लैंगिक वर्तन केले होते, हे सत्य मी तुझ्यासमोर मांडते आहे... याअगोदर मी हे का सांगितले नाही, आताच हे का सांगते



आहेस– या प्रश्नांना अर्थ नाही. माझ्या स्वतःच्या सत्याचा मान राखण्यासाठी मी हे सांगते आहे. माझी तुला ही सर्वात पवित्र भेट आहे.'' (६४)

ज्युली या १७ वर्षाच्या अमेरिकन मुलीवर नॉर्वेत गेली असताना तिच्या हॉटेलमधील खोलीत शिरून चाळिशीतला एक गृहस्थ बलात्कार करतो. कोर्टात तो निर्दोष सुटतो. ती आपल्या आईला हे सांगत नाही, पण बहिणीला सांगते. आई तिला लिहिते. ''मी तुझ्यावर प्रेम करते. माझ्यापासून तुला काहीही लपवावेसे वाटावे असे माझे वागणे नसावे. तुला शक्य तेवढे प्रेम व आधार मी देईन. तू मला काहीही सांगू शकतेस. तो अनुभव भयानक असेल. नशीब थोर म्हणून तू त्यातून पार पडू शकलीस. तुझ्यावर माया करायला व सोबत द्यायला मी तिथे नव्हते. याचे मला वाईट वाटते.''(७८)

ज्युली आईला उत्तर लिहिते, ''आई, तू माझ्याबरोबर कायम होतीस. तूच माझी शक्ती होतीस. तू मला शक्तिमान हवी आहेस. जेव्हा आपण एकत्र असू तेव्हा एकमेकांच्या मिठीत असू.''(८०)

सिल्व्हिया प्लाथ या कवयित्रीची बरीचे पत्रे या पुस्तकात आली आहेत. (पृष्ठे ७-११, १४२-१६१) बॉस्टन मध्ये जन्म. वडील ओझे प्लाथ हे जीवशास्त्रज्ञ. आई ओरेलिया स्कॉल. लग्नाआधी अध्यापिका होती, पण नवऱ्याच्या आग्रहामुळे लग्नानंतर केवळ गृहिणीची भूमिका निभावू लागली. सिल्व्हिया आठ वर्षांची असताना वडील वारले. ओरेलियाला नोकरी करणे भाग पडले. सिल्व्हियाला कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती मिळाली. तिच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. न्यूयॉर्कमधील मॅडमोसेल मासिकाच्या एका अंकाच्या 'अतिथी संपादक' पदी तिची योजना ती कॉलेजमध्ये असताना झाली. त्यामुळे तिचा उत्साह वाढला. परंतु हार्वर्ड समर स्कूलच्या क्रिएटिव्ह रायटिंग सेमिनारसाठी तिला प्रवेश न मिळाल्याने तिला मानसिक धक्का बसला. चौदा रात्री झोप आली नाही. झोपेच्या गोळ्या खाऊन ती तळघरात लपून बसली. तिसऱ्या दिवशी तिला शोधून रुग्णालयात नेण्यात आले. नंतर मनोरुग्णालयात उपचारासाठी ठेवण्यात आले. ती बरी झाली (दि बेल जार ही कादंबरी त्यावर आहे.) पुढच्या वर्षी तिला फुलब्राइट स्कॉलरशिप मिळाली. इंग्लंडमध्ये केंब्रिज युनिव्हर्सिटीत ती गेली. (१९५५) तेथे टेड ह्युजेस या कवीशी ओळख झाली. प्रेम जडले. लग्न झाले. दोन मुली झाल्या. परंतु नंतर त्या दोघांचे बिनसले. तिला नैराश्याचे झटके येऊ लागले. १९६३ मध्ये ओव्हनमध्ये डोके धरून तिने आपल्या जीवनाचा शेवट करून घेतला. तिने आईला लिहिलेल्या सातशे पत्रांचा संग्रह लेटर्स होम या नावाने प्रसिद्ध झाला आहे. एक कल्ट फिगर म्हणून तिच्या कविता तरुणवर्गात मान्यता पावल्या. तिच्या मानधनातून तरुण लेखकांसाठी एक केंद्र चालवले जाते. तिच्या मानसिक अवस्थेची कल्पना तिच्या पत्रांवरून येते.

या पुस्तकात घेतलेल्या आरंभीच्या पत्रात तिचे आईवरचे प्रेम व आदर प्रकट होतो. आईच्या लवचिकपणाचा, संघर्षानंतर पुन्हा मूळ पदावर येण्याच्या क्षमतेचा ती गौरव करते. इंग्लंडमध्ये ती आईला येण्याचा आग्रह करते. आपल्या नव्या धाटणीच्या कवितांविषयी ती लिहिते. ''अग आई, मी माझा आत्मा कसा घडवते आहे हे जरी तू नुसतं समजलीस ना, तरी बस्स!... मी लढते आहे आणि लढतच मी माझे स्वत्व घडवते आहे. वेदनेतून. माझ्याकडे

खूप प्रेम आहे ते देण्याची प्रचंड उर्मी आहे. ते प्रेम मी अवतीभवतीच्या लोकांना होमियोपाथीसारख्या छोट्या डोसातून देत आहे... मी अधिक कणखर बनत आहे. दुःखी असण्याचा हक्क मिळवण्यासाठीचा सृजनात्मक आविष्कार व आनंद असलेलं बळ प्राप्त करण्यासाठी मी धडपडते आहे.'' (१४५)

टेड ह्युजेसच्या प्रेमात पडल्यावर ती लिहिते, 'मला जगातील सर्वात समर्थ केंब्रिजमध्ये शिकलेला, हुशार, कवी वगैरे भेटला आहे. धिप्पाड, धष्टपुष्ट, दणकट तब्येतीचा ॲडम, अर्धा फ्रेंच आणि अर्धा आयरिश, घनगंभीर आवाज, गायक, कथाकथनकार आणि जगभर भटकणारा जिप्सी. कधीही न थांबणारा.'' (१४७).

''तुला अभिमान वाटावा अशी एक स्त्री मी बनले आहे. आई, अगदी विश्वास बसणार नाही असा टेड हा भन्नाट माणूस आहे. ''मी आता कशालाही डरत नाही. आणि जीवन हे चांगले असून माझ्या ओठावरलं ते उल्हासाचं गीत आहे.'' (१४९)

२७ ऑगस्ट १९६२ च्या पत्रात प्रथम टेडशी घटस्फोट घेण्याचा विचार ती प्रकट करते, ''टेडपासून रीतसर कायदेशीरपणे विभक्त होण्याच्या प्रयत्नात मी आहे. माझं लेखन थांबलेलं आहे. झोपेचा सर्वनाश होण्याचा बाकी आहे. माझ्या बाजूनं प्रचंड गोष्टी पणाला लावल्या गेल्या आहेत. मला मोकळीक हवी आहे. तरच माझी मी श्वास घेऊन जीवन हसत हसत जगू शकते.'' (१५४)

''अलीकडे मी कुणालाच लिहिलेलं नाहीय. उलथापालथ झाल्यानंतरची या सर्वांची अखेर मला दिसू लागली आहे. आईपणाच्या सुखातून, एकाकीपणाच्या नि चिंताजनक परिस्थितीच्या समस्यांमध्ये एकदम फेकलं जाणं ही मस्करी नाही.'' (१६१) हे तिचे शेवटचे पत्र.

अशा अनेक मायलेकींचे भावबंध मोकळेपणाने उलगडून दाखवणारी ही पत्रसंपदा कोणाही सहृदय वाचकाला झपाटून टाकील. वृंदा दाभोलकर यांनी या पत्रांची निवड व अनुवाद याबाबत खूपच साक्षेप दाखवला आहे.

**पृष्ठे** २७० **किंमत** : २००रु. **सवलतीत** : १७०रु. **सभासदांना** : १५०रु. **पोस्टेज** :२०रु.


**पालकांनी मुलांशी कसे वागावे याबद्दल**
**सखोल मार्गदर्शन करणारी महत्वपूर्ण पुस्तके**




**चीपर बाय डझन**
मूळ लेखक : फ्रँक बंकर गिलब्रेथ
अनु. मंगला निगुडकर
किंमत : १००रु.
सवलतीत : ८५रु.
सभासदांना : ७५रु.

**तुम्ही अन् तुमची मुलं**
मूळ लेखक : पार्किन्सन/रुस्तुमजी/पावरी
अनु. अविनाश भोमे
किंमत : ६०रु.
सवलतीत : ५१रु.
सभासदांना : ४५रु.




**पोस्टेज प्रत्येकी १५रु.**




# फुले आणि काटे

## मराठीतील अधिकांश प्रौढ साहित्य हे बालसुलभ साहित्य आहे

अर्वाचीन पाश्चात्त्य– व म्हणून अर्वाचीन मराठी– वाङ्मय अति–मानवकेंद्रित झाले आहे; जणू काही मानव हाच या विराट विश्वाचा अधिनायक आहे! खरे तर आपल्या अर्वाचीन प्रतिभावंतांनी आपले लोकसाहित्य व आपली मौखिक आर्ष महाकाव्ये यांच्यापासून प्रेरणा घेतली असती तर त्यांच्या लक्षात आले असते की, वनस्पती-पशुपक्षी ही भौतिक व भूतप्रेत-दैवदैत्य-यक्षकिन्नर ही कल्पित सृष्टी या साऱ्याचे मिळूनच विश्व बनले आहे. येथे अधिनायक असा कोणीच नाही. मग अस्तित्वाचा आडवा छेद न घेता मराठी साहित्यिकांनी अस्तित्वाचा उभा छेद घेतला असता. रोलिंगच्या साहित्याचे स्थान काहीही असो, तिच्यापासून मराठी सारस्वताने एवढा धडा घेतला तरी पुरे!

दुसरे असे की, टी.व्ही.मुळे ग्रंथसंस्कृती कोळपली हे सध्या खरे असले तरी ही तात्कालिक अवस्था आहे, असे मला नेहमी वाटायचे; रोलिंगने ते शंभर टक्के खरे करून दाखविले. टी.व्ही. हे दृक्श्राव्य माध्यम असल्यामुळे व घरी अनौपचारिक शरीर–मानस अवस्थेत त्याचा वापर शक्य असल्यामुळे त्याने आधुनिक मनांना भुरळच पाडली. केवळ या भौतिक अर्थानेच नव्हे तर आपल्या दुरंत शक्तीने त्याने आस्वादकाचे आस्वादस्वातंत्र्यच बाधित केले; आस्वादकाला गुलाम केले. ग्रंथ-मग तो कितीही महान का असेना– वाचकाला गुलाम करीत नाही; वाचक नेहमीच ग्रंथस्वामी असतो– ग्रंथ त्याच्या मुठीत असतो, तो ग्रंथाच्या मुठीत कधीच नसतो. त्यामुळेच त्याचे आस्वादस्वातंत्र्य, त्याची कल्पकता आणि त्याची संवेदनशीलता ग्रंथवाचनसमयी अबाधित राहते– आपण स्वतः गाडी चालविणे आणि दुसऱ्यानेगाडी चालविणे इतका या दोन प्रकारांमध्ये भेद आहे. त्या पाश्चात्त्य किशोरांना हे सांगता आले नसेल; पण कळले असेलच.

## टी. व्ही.ने वास्तव व कल्पित यातील आस्वाद भेदच नष्ट केला

आणखी एक म्हणजे टी.व्ही. ने वास्तव आणि कल्पित यांच्यांतील आस्वादभेदच नष्ट करून टाकला. बातम्यांमधील दारुण घटना ही वास्तव आहे व मालिकेतील दारुण घटना कल्पित आहे हे भान आज सुटत चालले आहे. हे कला आणि जीवनव्यवहार या दोहोंवरही अन्याय करणारे आहे; व्यक्तींची संवेदनशीलता दोन भिन्न प्रकारे दूषित करणारे आहे. ललित कलाकृतीचा आस्वाद घेताना त्या आस्वादप्रतीतीत विश्रांत व्हायचे असते; वास्तवाचे आकलन करताना विचारोन्मुख क्रियाशीलता जागृत करायची असते. ब्रेश्तने जाणिवेने व आजच्या दर्शकाने ('दर्शक' व 'प्रेक्षक' हे दोन शब्द वेगळे आहेत.) नकळत यात सरमिसळ केली आहे. हे फार घातक आहे.

## खास दिवाळीनिमित्त

# दीपोत्सव योजना

**गतवर्षीप्रमाणेच आम्ही या वर्षीही रसिक वाचकांसाठी खास दिवाळीनिमित्त एक आकर्षक योजना सादर करीत आहोत. पुढे आमच्या प्रकाशनाच्या दर्जेदार व लोकप्रिय पुस्तकांची यादी दिली आहे. या यादीत सर्व प्रकारच्या पुस्तकांचा समावेश आहे. यांतील जास्तीत जास्त पुस्तके खरेदी करा व योजनेतील सर्वाधिक सवलत मिळवा.**

खालील यादीतील

**२५००रु.किमतीची पुस्तके फक्त १६६७ रुपयांत मिळतील. (३३.३३%)**
**२०००रु.किमतीची पुस्तके फक्त १४०० रुपयांत मिळतील. (३०%)**
**१५००रु.किमतीची पुस्तके फक्त १०८८ रुपयांत मिळतील.(२७.५०%)**

१५००रु.पेक्षा कमी किमतीची पुस्तके घ्यावयाची असल्यास **'मेहता मराठी ग्रंथ जगत'** किंवा **'टी-बुक क्लब'** योजनेचे सभासद व्हा व खरेदीवर २५% सवलत मिळवा. अन्यथा १५०० रुपयांहून कमी किमतीची पुस्तके १५% सवलतीत मिळतील.

ही रक्कम आपण तीन हप्त्यांतही भरू शकाल. हप्त्यापोटी तीन पुढील तारखांचे चेक जमा करावेत. बाहेरगावच्या ग्राहकांनी प्रत्येक चेकसाठी १५रु.जादा पाठवावेत. पुस्तके घरपोच हवी असल्यास पोस्टखर्च ५०रु. पाठवावा.

या योजनेत स्वामी, श्रीमानयोगी, रुचिरा भाग १ व २ या पुस्तकांचा समावेश नाही.

## योजना ३१ जानेवारी २००१ पर्यंतच!

| | | |
|---|---|---|
| राधेय | रणजित देसाई | १०० |
| पावनखिंड | रणजित देसाई | १०० |
| बारी | रणजित देसाई | १०० |
| राजा रविवर्मा | रणजित देसाई | १५० |
| नेताजी | वि. स. वाळिंबे | २५० |
| भारत विकणे आहेः चित्रा सुब्रम्हण्यम | अनु. वि.स.वाळिंबे | १०० |
| झोंबी | आनंद यादव | २०० |
| काचवेल | आनंद यादव | २०० |
| डायरी ऑफ ॲन फ्रँक : **ॲन फ्रँक** | अनु. मंगला निगुडकर | १७५ |
| चीपर बाय दि डझन : **फ्रँक बंकर गिलब्रेथ** | अनु. मंगला निगुडक | १०० |
| नॉट विदाऊट माय डॉटरः **बेट्टी मेहमूदी** | अनु. लीना सोहोनी | २०० |



| | | |
|---|---|---|
| कॉंगो : मायकेल क्रिस्टन | अनु. अरुण मांडे | १६० |
| अणसार : वर्षा अडालजा | अनु. अंजनी नरवणे | १८० |
| कोमा : रॉबिन कुक | अनु. रवींद्र गुर्जर | ९० |
| मंदिरा : सुनील गंगोपाध्याय | अनु. तारा पंडित | १२५ |
| सुंदरबनच्या जंगलात : शिवशंकर मित्र | अनु. तारा पंडित | ६० |
| मुंबई... मुंबई ! : विक्रम चंद्र | अनु. नारायण आवटी | १५० |
| परिचय : अमृता प्रीतम | अनु. माधवी देसाई | ८० |
| द्वंद्व : विजयदान देथा | अनु. वनिता सावंत | १५० |
| नियती | माधवी देसाई | ६० |
| प्रार्थना | माधवी देसाई | १२५ |
| फॅक्टरी गेट | रंगा मराठे | १५० |
| मूल | संजोग वीरकर | ९० |
| गाजव्यथा | एम्. डी. लहानकर | १०० |
| दक्षिणरंग | मीना प्रभु | २५० |
| माझं लंडन | मीना प्रभु | २२५ |
| मालनगाथा | इंदिरा संत | १६० |
| मृद्‌गंध | इंदिरा संत | १५० |
| मुक्काम | सुधीर गाडगीळ | ७० |
| लाइफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२० |
| माझं माझ्यापाशी? | व. पु. काळे | १०० |
| निमित्त | व. पु. काळे | ७० |
| आपण सारे अर्जुन | व. पु. काळे | ८० |
| आंधळी | अनु. शान्ता ज. शेळके | १०० |
| चौघीजणी | अनु. शान्ता ज. शेळके | ३०० |
| रंगरेषा | शान्ता ज. शेळके | ७५ |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५ |
| निर्बाचित कलाम | अनु. मृणालिनी गडकरी | १५० |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२० |
| एक एक पाऊल (ओशो) | अनु. भारती पांडे | ८० |
| ध्यानसूत्र (ओशो) | अनु. माघव कर्वे | १०० |
| अंतराळ | अनु. उमा कुलकर्णी | १०० |
| पर्व | अनु. उमा कुलकर्णी | २५० |
| युगंधर | निरंजन घाटे | १०० |

| | | |
|---|---|---|
| रंग सुखाचे | डॉ. रमा मराठे | ६५ |
| कथा स्वातंत्र्यलढ्याच्या : आर. के. मूर्ती | अनु. माधव कर्वे | ६० |
| शिलंगणाचं सोनं | कुमार केतकर | २५० |
| नागरिक | अविनाश धर्माधिकारी | १५० |
| द प्लेन ट्रूथ : एन. के. सिंग | अनु. माधव मोर्डेकर | २५० |
| फ्रीडम ॲट मिडनाईट : डॉमनिक लॅपिए | अनु. माधव मोर्डेकर | ३०० |
| भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार | अनु. माधव मोर्डेकर | २०० |
| भारत : नेहरूंपासून नंदनवनापर्यंत : शशी थरूर | अनु. मधुकर तोरडमल | २०० |
| नाथ हा माझा | कांचन घाणेकर | २५० |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १०० |
| बिझिनेस महाराजे : गीता पिरामल | अनु. अशोक जैन | २५० |
| आय डेअर : किरण बेदी | अनु. आशा कर्दळे | २०० |
| इट्स ऑलवेज पॉसिबल : किरण बेदी | अनु. लीना सोहोनी | २५० |
| प्रवाहातील पक्षी | निलू गव्हाणकर | ७५ |
| सिलेक्टीव्ह मेमरी : शोभा डे | अनु. अपर्णा वेलणकर | ३३० |
| मी, फूलनदेवी : क्यूनी/रोंबाली | अनु. प्रमोद जोगळेकर | २५० |
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा | अनु. लीना सोहोनी | १०० |
| पृथ्वीवर माणूस उपराच! (विज्ञान) | सुरेशचंद्र नाडकर्णी | ५० |
| खिडकीलाही डोळे असतात (विज्ञान) | डॉ. बाळ फोंडके | ११० |
| सागर | माधवी देसाई | ६० |
| उत्तरार्ध | विजया राजाध्यक्ष | १२५ |
| निसटलेले | आशा बगे | १०० |
| ऋतूवेगळे | आशा बगे | ६० |
| खसखशीचा मळा | द. ता. भोसले | ७५ |
| मुळे आणि पाळे | वसंत नरहर फेणे | ८० |
| कालिंदीच्या तीरावरती | य. दि. फडके | ७५ |
| शेष-अवशेष | अरविंद रे | १२५ |
| तुम्ही अन् तुमची मुलं : पार्किन्सन/रुस्तुमजी/पावरी | अनु. अविनाश भोमे | ६० |
| तुम्ही आणि तुमचं वैवाहिक जीवन : पार्किन्सन/रुस्तुमजी/व्हिएरा | अनु. प्रमोद संभूस | ७० |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ५० |



| | | |
|---|---|---|
| ही सुट्टी कशी घालवाल? | मनोहर चंपानेरकर | ४२ |
| हृदयविकार निवारण | शुभदा गोगटे | १५० |
| निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ४० |
| अभ्यासातील प्राविण्य : दौलतभाई देसाई | अनु. वसंत नागपुरे | ३५ |
| यशाचा कानमंत्र : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ५० |
| आत्मविश्वासाचा कानमंत्र : अनंत पै | अनु. चारुलता पाटील | ३५ |
| आपण आणि आपले आरोग्य | अनु. प्रमोद जोगळेकर | ७० |
| वैज्ञानिक खेळणी | डी. एस्. इटोकर | ४५ |
| छंदातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | ६० |
| हा खेळ बाहुल्यांचा | डी. एस्. इटोकर | ५० |
| जिज्ञासेतून विज्ञान | कविता भालेराव | २५ |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : **कुलकर्णी/भागवत/गंभीर** | अनु. मीना किणीकर | ७० |
| प्रयोग करूया गमतीचे : कुलकर्णी/भागवत/गंभीर | अनु. मीना किणीकर | ७० |
| चला, प्रयोग करू या! | | |
| उर्जा | मीना किणीकर | २० |
| उष्णता | मीना किणीकर | २० |
| अन्न | मीना किणीकर | २० |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २० |
| रसायने | मीना किणीकर | २० |
| हवा | मीना किणीकर | २० |
| पदार्थ | मीना किणीकर | २० |
| अवकाश | मीना किणीकर | २० |
| हवास्थिती | मीना किणीकर | २० |
| गती : चलन | मीना किणीकर | २० |
| ध्वनी | मीना किणीकर | २० |
| मोजमापे | मीना किणीकर | २० |
| अज्ञात अनामिकांचे कर्तृत्व | अनु. वैशाली जोशी | ५० |
| किमया जनुकांची : बालसुब्रह्मण्यम | अनु. वैशाली जोशी | ७० |
| माहितीचे महामार्ग : के. डी. पावटे | अनु. वैशाली जोशी | ७० |
| जनुक मोहिम : सुकन्या दत्ता | अनु. वैशाली जोशी | ६० |
| परिक्षानळीतील जंगले : मॅस्कारेन्हास | अनु. प्रमोद जोगळेकर | ४५ |
| हिरवे जनुक : शकुंतला भट्टाचार्य | अनु. प्रमोद जोगळेकर | ६० |

| | | |
|---|---|---|
| जनुक शक्ती : दत्ता/भट्टाचार्य | अनु. प्रमोद जोगळेकर | ६० |
| नवचैतन्याचा झरा : डॉ. बाळ फोंडके | अनु. प्रमोद जोगळेकर | ६५ |
| विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रगती | नलगे / मुळीक | ७० |
| पर्यावरण संतुलनासाठी हिरवं सोनं | डॉ. सरिता पटवर्धन | ६० |
| शरीरातील विविध संस्था - | | |
| फुफ्फुसे, हृदय, मेंदू | वैशाली जोशी | २५ |
| अंतःस्त्राव, गर्भाशय, जठर | वैशाली जोशी | २५ |
| स्नायू, अस्थि | वैशाली जोशी | २५ |
| त्रिमिती | मीनाक्षी सरदेसाई | २५ |
| निवडक अरेबियन नाईटस् | वि. के. फडके | २० |
| कावळेदादा गेला भुलून! | पंढरीनाथ रेगे | १० |
| कृष्ण सुदामा | पंढरीनाथ रेगे | १० |
| चतुर ससोबा | पंढरीनाथ रेगे | १० |
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| मराठी लेखन दर्शन | चंद्रहास जोशी | ६० |
| मराठी निबंध ज्योती | चंद्रहास जोशी | ७० |
| अचूक मराठी लेखन प्रबोध | चंद्रहास जोशी | ३५ |
| ज्ञानदा निबंधमाला | दिपाली पोरे-वेल्हाळ | ५० |
| पर्याय शब्दकोश | वि. शं. ठकार | ३०० |
| Easy English Grammar & Composition | Manohar Champanerkar | 70 |
| Fifty Essays | Srinivas | 50 |
| A Methodical English Grammar 2000 | G. D. Moray | 110 |

आजच नोंदणी करा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** १२१६ सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२



# मेहता मराठी ग्रंथजगत


- **नोव्हेंबर २०००**
- **वर्ष पहिले**
- **अंक पहिला**

संपादक :
सुनील मेहता
कार्यकारी संपादक :
शंकर सारडा
संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर
अंकाची किंमत १० रु.
वार्षिक वर्गणी ८० रु.
वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी
प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - ग्रंथालये अद्ययावत माहितीकेंद्रे | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | १९ |
| **पुस्तक परिचय** | |
| आठवणींचा मोहर | २३ |
| आय् .सी.८१४ अपहरणाचे१७३ तास | २६ |
| गुंता सोडविताना | २८ |
| उत्तम स्मृतीचा कानमंत्र | ३२ |
| घरातील बाग | ३५ |
| हितगुज | ३८ |
| **फुले आणि काटे** | ४३ |
| **शब्दकोडे** | २२ |



मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ, धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२


*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*